


**निर्भयाची भयचकित कहाणी**

साप्ताहिक
संस्थापक साने गुरुजी
# साधना
Weekly Sadhana
शनिवार, ११ एप्रिल २०१५ | मूल्य रु.१०

## कोर्ट
## शंभर टक्के खरा सिनेमा

मीना कर्णिक



MKCL

# डिजीटल युगात आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी, MS-CIT सर्वांसाठी!



## MS-CIT का करावं?

- कंप्यूटरचे 'स्मार्ट' आणि सिरीअस यूझर होण्यासाठी
- डिजीटल युगात आत्मविश्वासाने पुढे राहण्यासाठी
- करिअर घडविण्यासाठी...
- दैनंदिन व्यवहारात MS-Office आणि Internet या आत्मविश्वासाने वापरण्यासाठी
- कंप्यूटर क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत अद्ययावत प्रशिक्षणासाठी
- कंप्यूटरमधील स्मार्ट कट्स आणि व्यावसायिक उपयोगासाठी

### अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

- नवीन MS-OFFICE 2013 मधील कौशल्ये आणि नवनिर्मित अभ्यासक्रम
- 80 हून जास्त केस स्टडीज् मधून 435 हून अधिक कंप्यूटर स्किल्स
- स्क्रॅच प्रोग्रॅमिंग, इंग्रजी व मराठी टायपिंग सहीत
- इंटरनेटचे 150 हून अधिक उपयोग
- 144 तास प्रशिक्षण
- डिजिटल सिटीझन आणि ऑफिस एक्स्पर्ट सर्टिफिकेटसह
- अंतिम परीक्षेनंतर शासकीय प्रमाणपत्र

Windows 7 | Office 2013 | Ergonomics | Go green

१५ लाखाहून अधिक लोकांना कंप्यूटरचे 'स्मार्ट यूझर' बनविणारा कोर्स...

| एकूण शुल्क (रु.) | | |
|---|---|---|
| एकरकमी | दोन हप्ते | तीन हप्ते |
| ३२५०/- | ३४५०/- | ३५५०/- |
| [illegible] | [illegible] | [illegible] |

२ किंवा ३ महिन्यांच्या हप्त्यांचे पर्याय उपलब्ध

अधिक माहितीसाठी नजीकच्या MS-CIT केंद्राला भेट द्या. अथवा संपर्क ✆ 9326552525

नवीन MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

# अनुक्रम


४
संपादकीय
**निर्भयाची भयचकित कहाणी**

७
**कोर्ट : शंभर टक्के खरा सिनेमा**
मीना कर्णिक

१०
**शार्लीचं काय करायचं?**
राजीव नाईक

१४
**भालचंद्र नेमाडे यांची मुलाखत**
मुलाखतकार : दामोदर खडसे

१९
**धर्मांधांच्या हातांतून धर्माला सोडवा**
सचिन परब

२३
**नास्तिक परिषदेत केलेले भाषण**
विनोद शिरसाठ

२७
**माझे विद्यार्थी** – सुजीत : माझा मित्र
रघुराज मेटकरी

३१
**गोहत्याबंदीसंबंधी इस्लामची भूमिका– आता दारूबंदी हवी**
एस. एन. पठाण

३३
**शरद यादवांचं काय चुकलं?**
कपिल पाटील



११ एप्रिल २०१५
वर्ष ६७ / अंक ३६

संपादक :
विनोद शिरसाठ

**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**

अंकनिर्मिती व्यवस्थापक व अक्षररचना :
**सुरेश माने**

मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

‘साधना’ हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी कॉम्प्-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड.इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले. संपादक– विनोद शिरसाठ.
Ph.: (020) 24451724
Mob.: 7028257757
weeklysadhana@gmail.com
web.weeklysadhana.com

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून.)

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ६०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १२०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : १८०० रुपये**

नाव, पत्ता, फोन नं व इ-मेल इत्यादी तपशील कळवून रोख/म.ऑ./डी.डी./चेक ‘साधना साप्ताहिक’ या नावाने काढून, रक्कम साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, खाते क्र. 60025586634, IFSC MAHB - 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल/फोन करून कळवावेत.

संपादकीय

# निर्भयाची भयचकित कहाणी

या वर्षीचा आंतरराष्ट्रीय महिलादिन भारतात कधी नव्हे इतका चर्चेचा व वादाचा विषय ठरला. 'इंडियाज डॉटर' ही एक तासाची डॉक्युमेंटरी बीबीसी दूरचित्रवाहिनीवरून जगभर दाखविली गेली. ही डॉक्युमेंटरी ८ मार्चला भारतभर एनडीटीव्ही नेटवर्कमार्फत दाखवली जाणार होती, पण केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने या डॉक्युमेंटरीवर बंदी घातल्याचे आदेश जारी केले. या निर्णयाचा निषेध म्हणून एनडीटीव्हीने प्रक्षेपणाचा एक तासाचा संपूर्ण वेळ ब्लॅक स्क्रीन आणि त्यावर 'इंडियाज डॉटर' हे शब्द व प्रज्वलित झालेली ज्योत एवढेच दाखवले. प्रक्षेपणाच्या नियोजित वेळेआधीच या डॉक्युमेंटरीतील एक आरोपी आणि दोन वकील अशा तिघांची वक्तव्ये सोशल मीडियाद्वारे झळकली. तेव्हा संभाव्य धोका लक्षात घेऊन, तातडीने पावले उचलून केंद्र सरकारने डॉक्युमेंटरीवर बंदी आणली. या बंदीच्या विरोधात जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे आणि येत्या १३ एप्रिलला न्यायालयाकडून बंदीचा निर्णय वैध की अवैध याबाबत निकाल दिला जाणार आहे. कोणत्याही दूरचित्रवाहिनीवर दाखवली गेली नसली, यू-ट्यूबवरून काढून टाकली असली आणि तिचे प्रक्षेपण जाहीरपणे फार कुठे केले गेले नसले; तरी मागील तीन आठवडे ही डॉक्युमेंटरी सोशल मीडियाद्वारे जगभर फिरत राहिली आहे. त्यामुळे 'बंदी फसली' अशी चर्चाही सर्वत्र झाली आहे आणि काही अपवाद वगळता बहुतेक सर्व स्तरांतून या बंदीच्या विरोधात भूमिका मांडली गेली आहे. या डॉक्युमेंटरीविषयी कमी, पण तिच्या निमित्ताने खूप जास्त मजकूर मुद्रित माध्यमांनी छापलेला आहे. पण तरीही सामान्यजनांना या डॉक्युमेंटरीविषयी व तिच्यावर घातल्या गेलेल्या बंदीविषयी 'मत' बनविणे शक्य झालेले नाही.

काय आहे या डॉक्युमेंटरीत? दि. १६ डिसेंबर २०१२ रोजी दिल्ली शहरात सायंकाळी साडेआठ वाजता, ज्योती सिंग नावाची २३ वर्षांची मुलगी व अवनिंद्र पांडे हा तिचा मित्र 'लाइफ ऑफ पाय' हा सिनेमा पाहून घरी परतण्यासाठी एका ट्रॅव्हल बसमध्ये बसले. त्या बसमध्ये ड्रायव्हरसह सहा जण होते, त्यांनी ज्योतीवर बलात्कार केला, नंतर तिला व तिच्या मित्राला खूप मारहाण केली, जखमी केले आणि बसमधून फेकून दिले. ही बातमी आल्यावर दिल्ली शहरात दुसऱ्या दिवशी लाखोंच्या संख्येने तरुणाई रस्त्यावर उतरली आणि प्रक्षोभक निदर्शने झाली. ज्योती सिंग तब्बल १३ दिवस मृत्यूशी झुंज देत होती, अखेर ऑर्गन्स ट्रान्सप्लँटिंगसाठी जगप्रसिद्ध असलेल्या सिंगापूर येथील हॉस्पिटलमध्ये तिचे निधन झाले. दरम्यानच्या त्या १३ दिवसांत भारतातील अनेक शहरांतील तरुणाईने पोलीस, प्रशासन व सरकार यांच्या विरोधात अभूतपूर्व रोष व्यक्त केला. ही घटना 'निर्भया'चा लढा म्हणून जगभर गाजली. निर्भया कोण आहे, कुठली आहे, कोणत्या जाती-धर्माची आहे याबाबतची काहीही माहिती नसताना, तिचे नावही माहीत नसताना असे अभूतपूर्व आंदोलन भारतात घडून आले... त्यातून निर्माण झालेला जनमताचा रेटा इतका होता की, बलात्काराच्या संदर्भातील कठोर कायदा संसदेने तातडीने मंजूर केला आणि निर्भया प्रकरणातील सर्व सहा आरोपींना पकडून त्यांच्यावर खटले दाखल झाले आणि न्यायालयीन प्रक्रिया झटपट पूर्ण करून सहापैकी चार आरोपींना फाशीची शिक्षाही सुनावली गेली; आता ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. उर्वरित दोन आरोपींपैकी एकाने पोलीस कोठडीत आत्महत्या केली आणि दुसरा आरोपी गुन्हा घडला तेव्हा साडेसतरा वर्षांचा होता, म्हणून त्याला तीन वर्षांसाठी सुधारगृहात ठेवण्यात आले आहे.

अशा या थरारक कहाणीतील गुंतागुंत उलगडून दाखवण्याचा प्रयत्न लेस्ली उदविन या ब्रिटिश दिग्दर्शिकेने 'इंडियाज डॉटर' या डॉक्युमेंटरीत केला आहे. पूर्ण एक तासाच्या या डॉक्युमेंटरीत माफक निवेदन आणि अत्यल्प भाष्य आहे. निर्भया प्रकरणाशी संबंधित काही प्रमुख व्यक्तींच्या मुलाखतींमधून घटनाक्रम आणि मत-मतांतरे पुढे आणली आहेत. या डॉक्युमेंटरीच्या केंद्रस्थानी आहेत : निर्भयाचे आई व वडील, सहापैकी एक आरोपी मुकेश सिंग



आरोपी : मुकेश सिंग                    कायद्याचे रखवालदार : ए. पी. सिंग आणि एम. एल. शर्मा

आणि आरोपींचे वकील ए.पी.सिंग व एम.एल. शर्मा. याशिवाय तीन पोलीस अधिकारी, आरोपींच्या घरातील काही व्यक्ती आणि ज्योती सिंग ऊर्फ निर्भयाचा एक मित्र. ही डॉक्युमेंटरी निर्भयाच्या कहाणीला किती विविध आयाम आहेत, हे दाखवण्याचा प्रयत्न ही डॉक्युमेंटरी करते आणि त्यामुळे कोणत्याही नॉर्मल माणसाची मती गुंग होते. यातील आरोपी व त्यांचे वकील यांची वक्तव्ये/मुक्ताफळे हा प्रामुख्याने वादाचा विषय झालेला आहे आणि डॉक्युमेंटरीवर बंदी आणण्याचे प्रमुख कारणही तेच आहे. आरोपी मुकेश सिंग हा त्या बसचा ड्रायव्हर होता, त्याने २० मिनिटे बस चालवली आणि त्या धावणाऱ्या बसमध्ये उर्वरित पाच जणांनी निर्भयावर आळीपाळीने बलात्कार केला, असे तो सांगतो आहे. (न्यायालयीन तपासात मात्र मुकेश सिंगही बलात्कारात सामील होता, असा पुरावा मिळालेला आहे) या मुकेश सिंगची एकूण सहा तास मुलाखत घेतली गेली आणि त्यातील चार-पाच तुकडे या डॉक्युमेंटरीत दाखवले गेले आहेत. त्याची मुक्ताफळे काय आहेत, बघा- ''टाळी एका हाताने वाजत नाही... बलात्काराला मुलांइतक्याच मुलीही जबाबदार असतात... रात्री नऊ वाजता कोणतीही 'शरीफ लडकी' घराबाहेर जाईलच कशी?... २० टक्केच मुली चांगल्या असतात... अनेक मुली तोकडे कपडे वापरतात, डिस्कोमध्ये जातात; त्यामुळे त्याच बलात्काराला अप्रत्यक्ष प्रोत्साहन देतात.... निर्भयाने बलात्काराला विरोध केला नसता तर आम्ही तिला मारून टाकले नसते... आता आम्हाला फाशी देण्याचा उलटाच परिणाम होईल; यापुढे बलात्कार करणारे लोक त्या मुलीला सोडून देणार नाहीत, तर मारूनच टाकतील... देशात इतके गुन्हे घडतात, काही प्रकरणांत मुलींना/महिलांना जिवंत जाळले जाते; त्यांना फाशी दिली नाही, तर मग आम्हाला का?'' आरोपींचे वकील एम.एल.शर्मा यांची मुक्ताफळे कशी आहेत बघा- ''भारतीय संस्कृती खूपच श्रेष्ठ आहे. स्त्री ही फुलासारखी असते, आकर्षक आणि मुलायम... पुरुष हा काट्यासारखा असतो, कठोर आणि बलवान... फुलाच्या संरक्षणासाठी काटे लागतात, तसेच स्त्रियांच्या संरक्षणासाठी पुरुष लागणारच... फुलाचा वापर कसा करायचा ते आपण ठरवावे, म्हणजे मंदिरात ठेवायचे की गटारात टाकायचे... 'स्त्री' ही डायमंडपेक्षा मौल्यवान असते आणि डायमंड ही घरात ठेवण्याची वस्तू असते, पण हातात डायमंड घेऊन तुम्ही घराबाहेर फिरत असाल तर कुत्रे तुमच्या मागे लागणारच.'' आरोपींचे दुसरे एक वकील ए.पी.सिंग म्हणतात, ''रात्री साडेआठ वाजता अनोळखी तरुणाबरोबर माझी बहीण किंवा मुलगी फिरणार असेल, तर मी तिला माझ्या फार्म हाऊसमध्ये पेट्रोल ओतून जिवंत जाळून टाकीन किंवा तिचे तुकडे-तुकडे करीन.'' पोलीस तपास करणारे एक अधिकारी म्हणतात, ''दिल्ली हे इतर विकसित देशांइतकेच सुरक्षित शहर आहे. या घटनेत आम्ही अतिशय जलद गतीने तपास करून आरोपींना शिक्षा ठोठावली.'' दुसरे पोलीस अधिकारी म्हणतात, ''साडेसतरा वर्षांचा जो आरोपी आहे, त्याला तीन वर्षांची शिक्षा योग्य आहे. आपला देश लोकशाही पद्धतीने चालणारा आहे. त्यामुळे इथे कोणाचे डोळे काढा, हात-पाय तोडा, ठेचून मारा- अशा प्रकारच्या शिक्षा देता येणार नाहीत.'' एक पोलीस कॉन्स्टेबल म्हणतात, ''१६

डिसेंबर २०१२ च्या रात्री साडेनऊ वाजता एक बस भरधाव वेगाने जात होती आणि 'बचाओ... बचाओ' असा आवाज ऐकला म्हणून मी बसचा पाठलाग केला; तर निर्भया व तिचा मित्र यांना पूर्ण नग्न अवस्थेत बसमधून बाहेर फेकण्यात आले. तेव्हा तीस-पस्तीस लोकांचा जमाव होता, पण कोणीही माझ्या मदतीला पुढे आले नाही.''

आरोपींपैकी चौघे दिल्लीतील रविदास कँप झोपडपट्टीतील आहेत. त्यातला एक बसक्लीनर आहे, एक फळांची गाडी चालवतो, एक ढाब्यावर काम करतो. त्यांच्या आई-वडिलांचे व घराचे चित्रण या डॉक्युमेंटरीत आहे. खंगलेली ही गरीब बिचारी माणसं मोडके-तोडके बोलत राहतात. त्यांचे दारिद्र्य व हतबलता लपून राहत नाही. साडेसतरा वर्षांच्या आरोपीचे आई-वडील म्हणतात, ''तीन वर्षांपूर्वी तो घरातून पळून गेला होता. आम्हाला वाटले तो मेला, पण तो जिवंत आहे हे आम्हाला आताच कळलेय.'' आणि एका आरोपीची गावाकडे राहणारी पोरगेली पत्नी म्हणते, ''पती की रक्षा तो उसका पती ही करता है ना.... जब पती नहीं रहेगा, तो हमारे बच्चे का गला मै घोट लूँगी.'' अतिशय परिपक्वतेचे दर्शन घडविणारे निर्भयाचे आई-वडील सांगतात, ''आम्हाला ही एकच मुलगी.... लहान असताना ती विचारायची, 'पपा, ये चाँद क्यूँ निकलता है?'... सर्वांत मोठे पद कोणते, असे ती विचारायची. मी सांगायचो, जज से बडा कोई नहीं होता. ती म्हणायची, 'नहीं, डॉक्टर से बडा कोई नहीं होता...' तिला डॉक्टर व्हायचे होते, पण आमच्याकडे पैसे नव्हते... तिने सांगितले, लग्नाला खर्च करू नका, माझ्या शिक्षणावर करा... आम्ही गावातील शेतजमीन विकली व शहरात आलो. तेव्हा लोक म्हणाले, मुलीसाठी तुम्ही इतके का करता?... डेहराडून येथील मेडिकल कॉलेजमध्ये ती शिकत होती. शेवटची परीक्षा देऊन आली होती... आता चांगले दिवस येतील असे सांगत होती, लेकिन खुदा को ही मंजूर नहीं था...'' निर्भयाचा एक मित्र सांगतोय, ''ती अत्यंत हुशार होती, तिचे इंग्रजी खूप चांगले होते. कॉल सेंटरमध्ये रात्री काम करून ती पैसे मिळवत असे. त्यामुळे तिला चार-पाच तासच झोप मिळत असे... स्वत:च्या खेडेगावात हॉस्पिटल उभारण्याचे तिचे स्वप्न होते...''

अशा या प्रमुख व्यक्तिरेखांची ही प्रमुख वक्तव्ये ऐकली, तर निर्भयाची कहाणी भयचकित करणारी आहे, अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे आणि त्यांना ठोस उत्तरे नसल्याची हतबलता उत्पन्न करणारी आहे. ही डॉक्युमेंटरी जनमानसाला शिक्षित करेल का? तर- होय, निश्चितच! ही डॉक्युमेंटरी डोळ्यांत अंजन घालणारी आहे का? तर- आहे! पण ही डॉक्युमेंटरी महिलावर्गात भय उत्पन्न करणारी आहे का? हो, आहे! ही डॉक्युमेंटरी समाजमनात भडका निर्माण करू शकणारी आहे का? आहे ना! ही डॉक्युमेंटरी समाजविघातक शक्तींना, अशांतता माजवण्याची संधी देणारी आहे का? आहे! ही डॉक्युमेंटरी चांगले काम करू पाहणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना बळ देणारी, पण त्यांच्याही नकळत समाजाचे नुकसान करू शकणारी आहे का? निश्चितच आहे! म्हणजे या सर्व परस्परविरोधी प्रश्नांना 'हो' असे उत्तर देणारी ही डॉक्युमेंटरी हे एक धारदार शस्त्र आहे. या शस्त्राचा वापर शांततेसाठी होऊ शकतो, तसा अशांततेसाठीही होऊ शकतो! त्यामुळेच 'या डॉक्युमेंटरीवर बंदी नसावी' हे अभिव्यक्तिस्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या लोकांचे म्हणणे पटते; तसेच 'ही डॉक्युमेंटरी समाजात, विशेषत: महिलावर्गात भय उत्पन्न करू शकते' हे पोलिसांचे म्हणणेही पटते. म्हणूनच, देशातील सामाजिक सलोखा व शांतता राखणे ही जबाबदारी ज्यांना निभवायची आहे, त्यांना बंदीची आवश्यकता वाटणे साहजिक आहे. आणि कदाचित त्यामुळेच, काँग्रेस व अन्य कोणत्याही मोठ्या राजकीय पक्षाने या बंदीला विरोध केलेला नाही.

'इंडियाज डॉटर' ही डॉक्युमेंटरी महाराष्ट्रातील शाळांमधून दाखवण्याची कल्पना विचाराधीन होती आणि १ लाख ८९ हजार प्रशिक्षित स्वयंसेवकांच्या माध्यमांतून जवळपास दोन कोटी मुला-मुलींपर्यंत ती पोचवावी, अशी योजना आखली जात होती. एवढेच नाही, तर महाराष्ट्रात हा प्रयोग यशस्वी झाला तर अन्य राज्यांतही तसे प्रशिक्षण घडवून आणण्याचा विचार चालू होता. पण केंद्र सरकाने बंदी आणल्याने या सर्वच शक्यता संपुष्टात येणार, असे दिसते आहे. विद्यमान केंद्र सरकारची एकूण नीती आणि संस्कृतिरक्षणाची भूमिका पाहता, त्यांना हे चित्र दाखवणे आवडणार नाही हे खरे! कारण, या डॉक्युमेंटरीतून भारतातील प्रतिगामी मानसिकतेचे प्रतिबिंब दिसते. पण एवढे मात्र निश्चित की, या डॉक्युमेंटरीत अवास्तव म्हणावे असे काही नसले तरी; आक्षेपार्ह भाग आहे, तो आरोपी व त्यांच्या दोन वकिलांची जबानी! म्हणजे गुन्हेगार आणि कायद्याचे रखवालदार किती सारख्या मनोवृत्तीचे असू शकतात, याची झलक या डॉक्युमेंटरीत पाहायला मिळते, जे आपण सभोवताली रोज पाहतच असतो...

✠

# कोर्ट : शंभर टक्के खरा सिनेमा

दिग्दर्शक चैतन्य ताम्हाणे याच्या ‘कोर्ट’ या पहिल्याच सिनेमाला २०१४चा सर्वोत्तम सिनेमाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. अत्यंत प्रभावीपणे पडद्यावर उलगडणाऱ्या या कोर्टरूम ड्रामाविषयी...

‘‘तू ‘कोर्ट’ बघितलास का?’’
‘‘तू अजून ‘कोर्ट’ नाही बघितलास?’’
‘‘तू ‘कोर्ट’ नक्की बघ.’’

वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या लोकांनी दिलेला हा सल्ला पुण्याच्या चित्रपट महोत्सवाला जाण्यापूर्वी मला मिळालेला होता. माझ्याप्रमाणे तो अनेकांना मिळालेला असणार, हे माहीत असल्यामुळे ‘कोर्ट’ला तुफान गर्दी होणार याची अपेक्षा होतीच. सिनेमा सुरू होण्याच्या दोन तास आधीपासून थिएटरच्या बाहेर लोकांनी रांग लावलेली होती. आधीचा सिनेमा पाहून बाहेर पडल्यानंतर ती रांग बघून आपल्याला आत जाता येणं शक्यच नाही, हे लक्षात आलं आणि कधी नव्हे ते मी ओळख काढून स्वत:साठी जागा मिळवली. आजवर कोणत्याही सिनेमासाठी कोणत्याही महोत्सवामध्ये मी हे केलेलं नव्हतं; पुढे कधी करेन, अशी शक्यताही नाही.

हे सगळं सांगायचं कारण एवढंच की, ‘कोर्ट’ने अपेक्षा भलत्याच वाढवून ठेवलेल्या होत्या. माझ्यासकट तिथे आलेल्या सगळ्यांच्याच. आणि महत्त्वाचं म्हणजे, आमच्यापैकी कुणाचाच अपेक्षाभंग झाला नाही.

सिनेमाच्या नावावरून हा कोर्टरूम ड्रामा असणार, हे उघड होतं. तसा तो आहेही. पण त्यातला ‘ड्रामा’ अत्यंत थंडपणे सांगितलेला आहे. आपल्यासमोर पडद्यावर जे घडतं, ते इतक्या अनड्रॅमॅटिक पद्धतीने आणि मॅटर ऑफ फॅक्टली घडतं की, सिनेमा संपतो तेव्हा त्या वास्तवाने आपल्याला हादरवून सोडलेलं असतं.

नारायण कांबळे (वीरा साथीदार) हे दलित शाहीर आणि कार्यकर्ता. पोवाडे गाऊन वस्ती-वस्तीत आपल्या समाजाला अन्यायाची जाणीव करून देणं, हे त्यांचं काम. पोटापाण्यासाठी आपल्या चाळीतल्या मुलांच्या ट्युशन्सही ते घेत असतात. एक दिवस पोलीस त्यांना पकडतात आणि त्यांच्यावर एका गामगाराला आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा आरोप ठेवला जातो. ही आत्महत्या केलेली असते एका सफाई कामगाराने. नारायण कांबळे यांचं गाणं ऐकून हा सफाई कामगार सुरक्षिततेचं कोणतंही साधन न वापरता गटारात उतरला आणि त्याने आत्महत्या केली, असं पोलिसांनी त्यांच्या आरोपपत्रात म्हटलेलं असतं.

न्यायमूर्ती सदावर्ते (प्रदीप जोशी) यांच्या सेशन्स कोर्टात खटला सुरू होतो. कांबळेंच्या बाजूने विनय व्होरा (विवेक गोंबर, जो या सिनेमाचा निर्माताही आहे) उभा राहतो, तर सरकारी वकील असते नूतन (गीतांजली कुलकर्णी). खटला म्हटलं की, आपल्यासमोर काही उत्तम सिनेमे येतात. ‘अ फ्यू गुड मेन’मधली टॉम क्रूझ आणि जॅक निकल्सनची जुगलबंदी आठवते. हिंदीतला ‘कानून’ किंवा अलीकडचा ‘जॉली एलएलबी’सारखा सिनेमा आठवतो. किंवा काही वेळा अतिशयोक्तीने भरलेली सिनेमांमधली किंवा आता टीव्हीमधून पाहिलेली दृश्यंही आठवतात. जोरदार भाषणं, अभिनय, तावातावाने केलेली आर्ग्युमेंट्स इत्यादी. पण इथे तसं काहीच होताना दिसत नाही. अगदी संथपणे, कायद्याच्या पुस्तकांमधली जड-जड वाक्यं वाचली जातात. त्यात ना कोणता अभिनिवेश आहे, ना अभिनय. असलाच तर एकसुरीपणा तेवढा आहे.

एका बाजूला सदावर्ते, विनय आणि नूतन यांची कोर्टातली इंटरॲक्शन; तर कांबळेंना अगदी अलिप्तपणे विचारले जाणारे प्रश्न आपण ऐकत असतो, मृत सफाई कामगाराच्या बायकोची जबानी ऐकत असतो आणि दुसऱ्या पातळीवर हा सिनेमा या तीन मुख्य व्यक्तिरेखांच्या व्यक्तिगत आयुष्यातही डोकावत राहतो. विनय नेहमीच चळवळीतल्या कार्यकर्त्यांचे खटले लढणारा वकील आहे, हे आपल्याला कळतं. त्याचं गुजराती कुटुंब अत्यंत सधन आहे. तो स्वत: उच्चभ्रू आयुष्य जगणारा मुलगा आहे. कधीमधी पब्समध्ये जाणं, उंची दारू पिणं हा त्याच्या लाईफस्टाईलचा भाग आहे.

नूतन एक मध्यमवर्गीय गृहिणी आहे. कोर्टातलं काम

आटोपलं की घरी जायचं, स्वैपाक करायचा, मुलाचा अभ्यास घ्यायचा, नवऱ्याला आणि मुलाला वाढायचं, मग मागचं सगळं आवरायचं- असा सर्वसाधारण बाईसारखाच तिचा दिनक्रम. सुट्टीच्या दिवशी मराठी नाटक बघायचं, एखाद्या साध्याशा रेस्टॉरन्टमध्ये जेवण करायचं, ही तिची एन्जॉयमेंटची कल्पना. प्रसंगी फोनवरून ती आपल्या मैत्रिणीला अत्यंत प्रेमाने वकिली सल्लाही देताना दिसते. पण तीच नूतन कोर्टात मात्र कांबळेंना प्रश्न विचारताना, त्यांच्यावर आरोप करताना त्यात किंचितही गुंतलेली असत नाही. ही आपली नोकरी आहे आणि ती अशीच अलिप्तपणे करायची असते, हे आपल्याकडच्या तमाम चाकरमान्यांप्रमाणे तिनेही ठरवून टाकलेलं आहे. इथे विचार करायचा तो केवळ पुस्तकी ज्ञानाच्या जोरावर, बाकी काही नाही. विनयचं तसं नाही. त्याला सामाजिक भान आहे. इथला वर्गभेद, जातिभेद यांची जाणीव आहे. परिवर्तनाचा प्रयत्न करणाऱ्यांचं इथली व्यवस्था कसं खच्चीकरण करते, हेही त्याला माहीत आहे. आणि आपल्या परीने तो त्या सगळ्या लढ्यात सामील झालेला आहे. सदावर्तेही मध्यमवर्गीय कुटुंबातले आहेत. न्यायाधीश असले तरी त्यांच्या जाणिवाही त्यांच्या भोवतालामधून आलेल्या आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा त्यांच्यावरही स्वाभाविकपणे आहे.

या तिघांच्या स्वतंत्र अशा व्यक्तिगत आयुष्याचा आणि कामाच्या ठिकाणी बांधल्या गेलेल्या आयुष्याचा उत्तम गोफ चैतन्य ताम्हाणेने बांधला आहे. आणि तो बांधताना त्याने आपल्याला जणू एक आरसा दाखवला आहे. इथली न्यायव्यवस्था, पोलीसव्यवस्था, समाज-व्यवस्था यांच्यावर झगझगीत प्रकाश टाकला आहे.

या सिनेमाला अनेक स्तर आहेत, ते एकमेकांमध्ये गुंतलेले आहेत. मध्यमवर्गीय आपल्या आयुष्यात इतके मग्न आहेत की, आपल्यापेक्षा खालच्या स्तरावर जगणाऱ्यांविषयीची सहानुभूती कुठे तरी लुप्त झालीये. आयुष्याच्या रोजच्या धबडग्यात बहुधा दुसऱ्यासाठीच्या

'डिअर सिनेमा' या वेबसाईटवर दिग्दर्शक चैतन्य ताम्हाणेची मुलाखत बिकास मिश्रा यांनी ६ सप्टेंबर २०१४ या दिवशी छापलेली आहे. त्यातला हा काही भाग-

**'कोर्ट'चा प्रवास कसा सुरू झाला?**

माझी 'सिक्स स्ट्रँड्स' ही शॉर्ट फिल्म नुकतीच संपली होती आणि विविध महोत्सवांमध्ये दाखवली जात होती. त्यावेळी, २०११मध्ये, माझ्या मनात 'कोर्ट'चा विषय आला. मी जॉन्र फिल्म्सचा त्या अर्थाने काही फॅन नाही. भारतीय वातावरणात कोर्ट केस कशी चालते हे एक्सप्लोअर करावं असं मला वाटलं. सुरुवातीला आम्ही भारतीय संदर्भात अत्यंत खरा असेल असा कोर्टरूम ड्रामा करणार होतो. त्याचा अभ्यास करायला सुरुवात केली आणि अधिकाधिक खोलात शिरू लागलो. प्रत्यक्ष कथेपेक्षा मला त्याचं सेटिंग अधिक भावलं कारण मुळातच मला रिसर्च करायला, वेगवेगळ्या लोकांच्या मुलाखती घ्यायला आवडतं. त्यावेळी मी २४ वर्षांचा होतो. दलित चळवळीची काहीही माहिती मला नव्हती. आणि कोर्टाचा अनुभवही कधी घेतलेला नव्हता. त्यामुळे माझ्यासाठी आजवर ठाऊक नसलेल्या गोष्टींना सामोरं जाणं होतं.

मुंबईत एक कोर्ट दुसऱ्यासारखं चालत नाही हे आमच्या लक्षात आलं. सिनेमांमधून आपण एकाच प्रकारचं कोर्ट पहात असतो. प्रत्यक्ष आयुष्यात प्रत्येक कोर्ट वेगळं असतं. बऱ्याच नंतर आमच्या लक्षात आलं की, शूटिंगसाठी योग्य वातावरण हवं असेल, तर आपल्याला सेट तयार करायला हवा. त्यामुळे असं झालं की आमची इतर सगळी लोकेशन्स खरी होती आणि कोर्ट वेगळं वाटू नये असा आमचा प्रयत्न होता.

**सिनेमा लिहिण्याची तुझी प्रोसेस कशी होती?**

मी खूप नोट्स काढतो. व्हिडिओ रेफरन्सेस, फोटो, डॉक्युमेंटरींचे संदर्भ खूप काही जमवतो. मी घेतलेल्या मुलाखतींच्या नोट्स माझ्या मीच काढतो. मग हळूहळू व्यक्तिरेखा आणि घटना मनात आकार घ्यायला लागतात. मग घटनाक्रम लिहायला घेतो. स्क्रिप्ट माझ्या मनात अगदी शेवटी आकार घेतं. ही वेळ येईपर्यंत आपण आता लिहू शकतो अशी माझी मलाच खात्री पटलेली असणं आवश्यक असतं.

'कोर्ट'च्या बाबतीत असं घडलं की माझ्यापाशी वकील, न्यायमूर्ती यांच्या व्यक्तिगत आयुष्याची माहिती बराच काळ जमा झालेली होती. आजुबाजूच्या गोष्टी तयार झाल्या होत्या. पण मुळात कोर्टातली केसच माझ्यापाशी नव्हती. आणि ते खूप महत्त्वाचं होतं. कारण कोणत्या प्रकारची कोर्ट केस आपल्याला नकोय हे मला माहीत होतं. मग एक दिवस हे कोडं सुटलं. गटार साफ करणाऱ्या एका सफाई कामगारावर आत्महत्येचा प्रयत्न केला म्हणून केस केली जाते. मूळ केस ही होती. पण मग त्यात अनेक

संवेदनशीलतेला जागाच उरलेली नाही. त्याउलट, विनयसारखी उच्चभ्रू समाजातून आलेली माणसं सामाजिक दृष्ट्या अधिक जागरूक आहेत. आर्थिक विवंचना नसल्यामुळे असेल; पण समाजाचं आपण काही देणं लागतो, असं त्यांना वाटतंय. पुन्हा हे सरसकट खरं आहे, असंही म्हणता येणार नाही किंवा प्रातिनिधिक आहे, असंही नाही. विनयचे आई-वडील किंवा परदेशात राहणारी बहीण काही विनयसारखी नाही. पण तरीही या मुख्य व्यक्तिरेखांमधून दिग्दर्शक आपल्याला काही सांगू पाहतोय. इथल्या विषम व्यवस्थेकडे आपलं लक्ष वेधू पाहतोय. आणि त्यासाठी त्याने निवडलेली गोष्ट किंवा ती गोष्ट सांगायची पद्धत एकाच वेळेला साधी-सरळ आणि गुंतागुंतीचीही आहे. न्यायालयात चालणाऱ्या कामामधला रटाळपणा या कोर्टरूम 'ड्रामा'मध्ये आपण पाहतो. पण तो आपल्यासाठी कंटाळवाणा होत नाही. दिग्दर्शकाचं हे मोठं कसब म्हणायला हवं.

या सिनेमातली प्रत्येक व्यक्तिरेखा खरी वाटते. त्यांतल्या काही अभिनेत्यांनी साकारल्या आहेत, तर काही आजवर कॅमेऱ्यासमोर कधीही उभ्या न राहिलेल्या कलाकारांनी. पण सिनेमा पाहताना आपण त्यांना वेगळं काढू शकत नाही, इतके हे सर्व कलावंत आपापल्या व्यक्तिरेखांमध्ये खरे वाटतात. दिग्दर्शकाने निवडलेली लोकेशन्सही अशीच. कॅमेराही जणू सहजी फिरल्यासारखा एक व्यक्तिरेखा बनून वावरतो. कुठे सॉलिड शॉट घेतल्याचा आविर्भाव नाही, की कोणत्याही क्लृप्त्या नाहीत. सगळं कसं जसं आहे तसं, जेवढं आहे तसं. शंभर टक्के खरंखुरं. आणि म्हणूनच अस्वस्थ करणारं. मनात बराच काळ रेंगाळणारं. विचार करायला लावणारं.

**मीना कर्णिक,** मुंबई
meenakarnik@gmail.com
Mob.: 9819767518

गोष्टींची भर पडत गेली. सफाई कामगारांबद्दल मी एक लेख वाचला होता डॉ.बिनायक सेन यांच्यावर झालेल्या खटल्याविषयी लेख वाचलेला होता. कबीर कला मंचवरच्या खटल्याचं वाचन झालेलं होतं. या सगळ्या गोष्टी मग त्यात हळूहळू आल्या.

**स्क्रिप्ट लिहिताना पडद्यावर ही गोष्ट कशी दिसेल, ती दाखवण्याची आपली स्टाईल कशी असेल याविषयी तुझ्या मनात काही विचार होता?**

मला लांब टेक्स आणि वाईड शॉट्स घ्यायचे आहेत, हे मला नक्की माहीत होतं. माझा कॅमेरा निरीक्षण करणारा आहे आणि तो संथ गतीने वावरतोय, हे मला हवं होतं. आपण ऑब्जेक्टिव्ह आहोत, असा आभास निर्माण करायचा होता. खरं तर ऑब्जेक्टिव्ह असं काही नसतं, पण आपण थोडे तटस्थ आणि दूर राहून घडणाऱ्या गोष्टींकडे पाहू शकतो.

वास्तववादाला मर्यादा नसते. सिनेमाच्या स्क्रिप्टवरचा माझा रिसर्च झाल्यानंतर प्री-प्रॉडक्शनवर मी आणखी सहा महिने घालवले. मग सहा महिने कलावंत नक्की करण्यासाठी आणि आठ महिने लोकेशनची रेकी करण्यासाठी. आमची सगळी टीम प्रत्यक्ष शूटिंग करण्याआधीपासून कामाला लागली होती. 'जय भीम कॉम्रेड'सारखी डॉक्युमेंटरी बघणं, चळवळीतल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करणं, राजकीय गटांबरोबर बोलणं, त्यांच्या घरी जाणं, फोटो काढणं, त्यांच्या घरातल्या सामानाचे फोटो काढणं, त्यांच्याबरोबर विविध कार्यक्रमांना जाणं इत्यादी गोष्टी आम्ही करत होतो.

**तुला तुझा निर्माता विवेक गोंबर कसा सापडला?**

'विवेकने माझ्या एका नाटकात काम केलं होतं. ग्रे एलिफन्ट्स इन डेनमार्क नावाचं एक नाटक मी लिहिलं आणि दिग्दर्शित केलं होतं. तो बॉस्टनहून अभिनयाचं प्रशिक्षण घेऊन आलेला आहे आणि मुंबईत गेली आठ नऊ वर्षं थिएटर करतोय. मी त्याचं काम आधी बघितलेलं होतं आणि मला ते आवडलंही होतं. शॉर्ट फिल्म केल्यानंतर आणि एक नाटक दिग्दर्शित केल्यानंतर मी पूर्ण खंक झालो होतो आणि पुढे काय करायचं कळत नव्हतं. नोकरी शोधायच्या प्रयत्नात होतो. खूप वाईट काळ होता. आणि त्यावेळी मला विवेक भेटला. गप्पांमध्ये त्याने मला 'तू लिहीत का नाहीस' असं विचारलं. मी त्याला म्हटलं, 'माझ्या डोक्यात एक कल्पना आहे, पण मला स्वत:चा खर्च भागवण्यासाठी महिन्याला पंधरा हजार रुपये लागतील त्याचं काय?' त्याने मला ते देण्याचं मान्य केलं. पण असे उपकार कसे स्वीकारणार? तरीही त्याने आग्रहच केला. 'तू लिहितोस ते मला आवडतं' असं म्हणाला. मी वर्षभर काम केलं आणि स्क्रिप्ट लिहिलं. ते त्याला आवडलं. त्याने निर्माता व्हायचं ठरवलं. आणि नट म्हणून मला तो आवडत असल्याने मी त्याला मुख्य भूमिका ऑफर केली. कोणाचा कदाचित यावर विश्वास बसणार नाही, पण खरंच जे घडलं ते नेमकं असंच आहे.'

# शार्लीचं काय करायचं?

**तुमच्या मूर्तीला म्हणजे तुम्ही ज्यांना अपार मानता अशा कुणालाही असं टारगेट केल्याची कल्पना करा. नागडं-उघडं केल्याची कल्पना करा. रक्त खवळेल ना? मध्यंतरी नेहरू-आंबेडकर व्यंगचित्रावरून वादंग उठलंच होतं. पण त्या व्यंगचित्रात टवाळी नव्हतीच. (अर्थात हेही फक्त एका वाचकाचं, माझं मत झालं!) 'शार्ली'वाल्या व्यंगचित्रांमध्ये विखारही आहे. विखारी लिहिण्याचा हक्कही विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्यात अनुस्यूत असायला हवा ना? प्रश्न अधिक बिकट होतो त्याने.**

महात्मा फुले यांच्या 'गुलामगिरी' (१८७३) या पुस्तकाचं पुनर्वाचन करत होतो. या पुस्तकाचा आशय व शैलीबद्दल मनात विचार सुरू असतानाच 'शार्ली हेब्दो'मधल्या पैगंबरांवरील व्यंगचित्रामुळे हिंसा घडली. हिंसेच्या आधी अर्थातच अनेकांची मनं त्या व्यंगचित्रामुळे दुखावली.

'विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य' हे एक निरपवाद, चिरंतन मूल्य आहे, असं मी मानतो. त्यावर कुठलाही अंकुश असता कामा नये. वयाने प्रौढ माणसांकडे संपूर्ण निर्णयस्वातंत्र्य आहे.

मी वर्तमानकाळ वापरतो आहे, पण मी आता थोडा बावचळलो आहे. मला कुणाच्या भावना दुखावल्या जायला नको आहेत का? असं न करता कुठलंही लेखन करताच येणार नाही- किंबहुना, करण्यात अर्थच नाही, असं म्हणता येईल. मी जे आणि ज्या तऱ्हेने व्यक्त करेन, त्याच्याशी माझी निष्ठा मात्र असायला हवी.

मग मी का कचरतो आहे? हिंसा कुठल्याही परिस्थितीत निंद्य, असंही मी मानतो. जर एखाद्याने काही तरी अभिव्यक्त केल्याने मानवसमूहांमध्ये सांधलेच न जाणारे तट पडणार असतील आणि भयानक हिंसा-कदाचित ते अखेरचं तिसरं महायुद्ध- घडणार असेल, तर? हा 'तर' घाबरवतो.

परत 'गुलामगिरी'कडे येतो. पुराणांमधून उभ्या राहणाऱ्या ब्राह्मणवादावर त्यात जबरदस्त प्रहार आहे आणि शैलीही जहाल आहे. फुल्यांनी एक समांतर अब्राह्मणी पुराणेतिहास रचला आहे. पण ही पूर्णपणे तात्त्विक अंगाने जाणारी धर्मचिकित्सा नव्हे. ते उपरोध, उपहास, खिल्ली, टिंगल अशी सर्व आयुधं वापरतात. त्यांच्या अभिव्यक्तीमधला बिनबोटचेपेपणा तर अफलातून वाटतो. मला फुले यांचं 'गुलामगिरी' लिहिण्याचं स्वातंत्र्य तर अर्थातच मान्य आहे. पण याचं कारण मला फुल्यांचा ब्राह्मण-पुरोहितविरोध पूर्णपणे पटतो, हे तर नाही ना?

आपल्याला न पटणारं, कदाचित आपल्या भावना दुखावणारं असं काही अभिव्यक्त करण्याचं स्वातंत्र्य दुसऱ्यांना देता यायला नको का? 'गुलामगिरी' आणि 'मी नथुराम गोडसे बोलतोय' या दोन तऱ्हेचे आविष्कार आज आपल्या समाजात 'मुक्त' आहेत. मुरुगन यांच्याबद्दलही निदान हळहळ व्यक्त होते आहे. पण 'शार्ली हेब्दो'च्या बाबतीत निःसंदिग्ध अशी भूमिका मराठी लेखक का घेत नाही आहेत? (मी एक मराठी लेखक आहे.)

या बाबतीत स्वनियंत्रण, न्याय्य असणं, सदसद्विवेकबुद्धी, अभिरुची इत्यादींचा उल्लेख होतो आहे. जर विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य विनाअट नसेल, तर त्याला काहीही अर्थ उरत नाही. कारण मग या मर्यादा, रेषा इत्यादी ठरवायचं कुणी? याचे निकष काय नि नियम कोणते? त्या-त्या वेळी परिस्थिती अभ्यासून निर्णय घ्यायचा, तर मग न्यायाधीश कोण? जो-तो तर न्यायाधीश होऊ शकत नाही? सत्ताधारी तर नाहीच होऊ शकत. गंमत अशी की- नेमकी व निश्चित, इंटरप्रीट करावी न लागणारी वस्तुनिष्ठ नियमावली नसेल, तर खरोखरीचा न्यायाधीशही या बाबतीत न्यायाधीश होऊ नाही शकत.

'शार्ली हेब्दो'ची शैली व्यंगचित्रांची अर्थात एका परीच्या विनोदाची आहे. निर्विष विनोदाची आपल्याकडे मोठी ख्याती आहे, पण विनोद पूर्णपणे निर्विष होऊ शकतो का? आणि झालाच तर त्याचा परिणाम तो काय? आणि

हो, त्यात मग विनोद तरी काय? त्यात, व्यंगचित्रामध्ये टीका काहीशी अनुस्यूतच असते ना? झोंबावं, पण फार नाही; वार करावा, पण कंबरेखालचा नाही; विडंबन करावं, पण विटंबना नाही. हे खरं. पण या सीमारेषा (बहुतेक सीमारेषांप्रमाणे) पुसटच नाहीत काय? तमाशाला सोवळं करण्यात काय अर्थ आहे बरं?

'या' परिस्थितीत अभिव्यक्तिस्वातंत्र्याला होकार, 'त्या' परिस्थितीत नकार म्हणजे काय? त्यात पुन्हा हिंदूंना एक नियम, मुस्लिमांना वेगळा, ख्रिश्चनांना तिसरा- असंही उपयोगाचं नाही. गटानुसार, मतप्रणालीनुसार, श्रद्धांनुसार विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्याबद्दलचे निर्णय घेऊन कामाचं नाही. काय, करायचं काय?

या सगळ्यामध्ये त्या व्यंगचित्रांचा आशय-विचार होतो का? ज्यांचा आहे, त्यांचा फक्त या शैलीला विरोध आहे का? हा आशय 'सभ्यपणे' वगैरे मांडलेला विरोधकांना चालणार आहे का? (इथे एक जटिल तात्त्विक मुद्दा उपस्थित होतो. रूपातूनच शेवटी आशय व्यक्त होत असेल; तर त्या रूपशैलीतच आशय आहे, असं म्हटलं पाहिजे.) 'शार्ली हेब्दो'मधल्या सर्व व्यंगचित्रांमागे एक धर्मविरोधी, किंबहुना कुठल्याही एस्टॅब्लिशमेंटच्या विरोधात भूमिका जाणवते. इस्लामच्या बाबतीत कुठलीही धर्मचिकित्सा कुणी व कशी करावी, हाही प्रश्न उद्‌भवतो.

'शार्ली हेब्दो'वाले जे करत आहेत, ते जाणीवपूर्वक करत आहेत (यात जाणून-बुजूनही आलं). त्यांना इस्लामच्या विरोधात भूमिका घ्यायचीच आहे, ते 'सर्वधर्मसमभाव' असा 'सेक्युलर'चा अर्थ लावत नसावेत. ते त्यांच्या भूमिकेकरता मरायलाही तयार आहेत, हे उघड आहे. हा त्यांचा जिहाद आहे का? पण, आपण काय करायचं?

देव ही संकल्पना मला पोकळ, अर्थरहित वाटते. त्यामुळे मी कुठलाही धर्म मानण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पण इतरांना देव मानण्याचा व धर्म पाळण्याचा अधिकार आहे, त्यांना विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य (कुणाहीप्रमाणे) आहे. याला माझ्या कुठल्या कृतीने बाधा पोचते का, हाही अवघड प्रश्न आहे.

त्यात करायची ठरवली तरी कुठलीही धर्मचिकित्सा सोपी नाही. भाषेपासून समस्या सुरू होतात. मी 'पवित्र कुर्‌आन' वाचलं, मराठी व इंग्रजी भाषांतरात. हे 'मान्य' नाही. ते उर्दू वा फार्सीत वाचूनही भागत नाही. अरबीतच वाचायला हवं. त्यात पुन्हा नुक्ताचीनीचा अत्यंत किचकट प्रकार आहे. पुन्हा बायबलच्या हर्मेन्युटिक्सप्रमाणे अर्थ लावण्याच्या, इंटरप्रिटेशनच्या समस्या आहेतच. या वाङ्‌मयाकडे धर्मग्रंथ म्हणून पाहायचं, इतिहास म्हणून पाहायचं, मिथकं म्हणून पाहायचं की अन्य कुठल्या तऱ्हेने पाहायचं, हे ठरवणंही मुश्कील आहे. धर्मचिकित्सेला एक गांभीर्य हवं, अशीही भूमिका घेतली जाऊ शकते. आणि कार्टून (वा विनोद) पुरेसे गंभीर असूच शकत नाही, अशीही.

विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य यामध्ये आशय व शैली दोन्ही अभिप्रेत आहे आणि कुठल्याही व्यंगचित्राला रूप/आशय असतो, खरं तर रूपाशय असतो. हा 'आशय चालेल, पण ही तऱ्हा नको' असं आहे का? (पुन्हा, असं संभवतं का, हा निराळाच मुद्दा झाला.)

जे बेलाशक, निर्भीडपणे आपलं म्हणणं मांडतात; उदाहरणार्थ- फुले, टिळक, गांधी, आंबेडकर; ते स्वतः परिणामांना तयार असतात, असं दिसतं. त्यांना मरू न देणं हे समाजाचं कर्तव्य आहे; पण ते मरायला तयार असतात, हेही महत्त्वाचं. (ही उदाहरणं समाजकारणातली, राजकारणातली झाली. कलेबाबतही हे सर्व मुद्दे खरे ठरतील ना?)

गणपती उत्सवावर मध्यंतरी कुणी काही म्हटलं, तर खूप हिंदू चिडले. (ते स्वाभाविक आहेच.) किती मुस्लिम चिडले? पण या 'शार्ली' प्रश्नावर हे हिंदू चिडले नाहीत का? हुसेनांनी हिंदू देवतांची नग्न चित्रं काढणं बरोबर नाही, असं कुठल्या मुस्लिमांनी म्हटलं का? का नाही; मला ठाऊक नाही. म्हणजे हे सगळं त्या-त्या गटापुरतंच म्हणायचं की काय? गटागटाची एक परंपरा असते आणि तिचा आदर केला पाहिजे, असं म्हणता येईल. म्हणजे हिंदू-भारतीय(!) कलापरंपरेत नग्न देवतांची चित्रं चालतात; मग ती कुणीही काढली तरी चालतील, मुस्लिमानेही. तसंच जर मुस्लिम कलापरंपरेत (इथे देशाचा उल्लेख नाही) जर अल्लाह व पैगंबराचं चित्र वर्ज्य असेल, तर ते कुणीही काढलं तरी चालणार नाही- ख्रिश्चनानेही.

हुसेन यांना नग्न देवता चितारण्याचा अधिकार एक कलावंत म्हणून आहे खरा, पण एक मुस्लिम म्हणून तो नसावा बहुतेक. कारण इस्लाम परंपरेत मूर्ती करणंच निषिद्ध आहे. असो. त्यांनी इंदिराबाईंचं दुर्गेच्या रूपातलं चित्रही काढलं होतं. पण माझं या चित्रांबद्दलचं काहीही मत असलं तरी हुसेन यांना त्यांना काय हवं ते काढण्याचं स्वातंत्र्य आहे, असंच मी मानलं. नग्न देवतांच्या शिल्पांचा इतिहास आहे; पण हा कदाचित फारच वेगळा मुद्दा होईल, किंवा नाहीही.

इथे आणखीन एक गोष्ट आहे. जर अशी परंपराच नाही, तर मी चित्र काढून खाली नाव दिल्याने तो आयकॉन इतका लवकर स्थापित कसा होतो? (चित्रामुळे की भाषेमुळे, हा एक उपमुद्दा.) आणि परंपरा नसलेली मूर्ती कुणी नव्याने स्वतःच निर्माण केली, तरी त्याची विटंबना होऊ शकते काय? त्या चित्रात 'दैवी' वा 'धार्मिक' असं काही सूचित करण्याचा प्रयत्न आहे काय? (उदाहरणार्थ- रविवर्मा यांच्या नऊवारीतली लक्ष्मीसुद्धा 'दैवी' वाटते.) शार्लीवाल्यांनी विडंबन/विटंबना करण्यासाठीच मूर्ती निर्माण केलेली आहे. तिची पूजा तत्त्वतःच असंभव आहे. हा आयकॉनोग्राफीचा अभ्यासकांचा मुद्दा आहे. पण त्यातला 'अभिव्यक्तिस्वातंत्र्या'शी निगडित भाग पाहू.

अफगाणिस्तानातल्या बुद्धमूर्ती फोडणं निषेधार्ह; त्याचं एक कारण की, त्या सुंदर होत्या (अर्थातच हे व्यक्तिनिष्ठ आहे). पण दुसरं असंही आहे की, त्यामुळे बौद्धधर्मीयांना दुःख झालं. (म्हणून इतरांना पुन्हा झालंच.) जर शार्लीवाल्यांनी पैगंबरांची प्रतिमा निर्माण केली नसती आणि ती आधीपासूनच असती, तर तिची 'करून टाकणं' एकदम तडक निषेधार्ह झालं असतं. मग आता ती त्यांनी नव्याने निर्माण केली आणि त्यांनीच विटंबवली, तरी ते निषेधार्हच नव्हे काय? बरं, त्यात 'मूर्तिभंजकता' इस्लाममध्ये चालते; एवढंच नाही, तर तशी कृती पवित्रही मानली जाते. (हे बरोबर आहे ना?) मग जर इतर धर्मांतल्या मूर्तींचं भंजन चालतं, तर मग इस्लामी परंपरेमध्ये नसलेल्याच मूर्तीचं निर्माण करून तिचं भंजन/विटंबन केलं तर ते चूक ठरेल काय? म्हणजे आधी मूर्तिनिर्माण चूक नि मग भंजन/ विटंबनही चूक.

अशा वेळी हे चूक आहे, असं मुस्लिम म्हणू शकतील का? हे चिडू शकतील, त्यांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतील; पण ते एक मुस्लिम म्हणून मूर्तीच्या भंजनाबद्दल वा विटंबनाबद्दल आक्षेप घेऊ शकतील का? तो बिगर-मुस्लिमांना, किंबहुना निधर्मीयांनाच घेता येईल. पण मुद्दा हा की, तो त्यांनी घ्यावा का? मग पुन्हा, शार्लीवाल्यांच्या वा एकूणच विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचं काय?

एखादा विचार, कृती, अभिव्यक्ती 'मानवजातीच्या हिताची नाही वा शोषणाला खतपाणी घालणारी आहे' म्हणून निर्बंध आणणं तत्त्वतः मान्य करावंसं वाटेल; पण त्यालाही काहीएक अर्थ नाही. कारण परत, हे ठरवणार कोण? 'आपलं ते खरं' असा जो-तो गट मानतच आला आहे, असं इतिहास सांगतो ना? शोषक-शोषितदेखील नेमकेपणाने आयडेंटिफाय करणं-ठरवणं अवघड नव्हे काय? रशिया, अमेरिका, भारत अशा सर्वच देशांत सर्वच काळांत हे ठरवणं अवघड; ठरवून टाकणं तर अशक्यच.

म्हणजे, या व्यंगचित्रांच्या आशयाकडे वळलं तरीही प्रश्नचिन्हं मिटणार नाहीत. तो आशय बरोबर, पण शैली चूक- असं कशावरून म्हणणार, हे एक; आणि दुसरं म्हणजे, आशय बरोबर की चूक हे कोण व कसं ठरवणार? आणि पुन्हा आशय बरोबर असला, तर कुठलीही शैली चालेलच. गुंता गच्च आहे. विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य विनाअट पुकारलं नाही, तर तो सुटणं अवघड. आणि पुकारलं, तरी हा वसा न टाकणंही अवघड.

आपण स्वतः न्यायाधीश तर अजिबात होऊ शकत नाही, कारण आपलंच चूक असण्याची शक्यता खूपच आहे. शिवाय असा अधिकार स्वतःला बहाल करणं, हे अरेरावीचं आहे. (तो अधिकार असलाच, तर पुन्हा सगळ्यांनाच असायला हवा.)

'मरायला तयार असणं' या तत्त्वाचा विपर्यास अगदीच होऊ शकतो. तो काही निकष म्हणून मी सुचवत नाही. पण मी एखाद्याची आय-माय काढणार आणि त्याने मात्र माझ्या थोतरीत लगावायची नाही, हे कसं व्हावं? 'मला हे म्हटलंच पाहिजे आणि असंच म्हटलं पाहिजे', ही निकड महत्त्वाची नाही काय? आपल्या लिखाणावर मरणाची निष्ठा हवी, असा याचा रूपकात्म अर्थ घ्यावा. निदान निकराच्या प्रश्नांबाबत. पण म्हणजे, पुन्हा कुठल्या?

प्रश्न 'मी'- म्हणजे लेखकाने काही म्हणण्याचा नाहीच. मी जबाबदारीने लिहितो, असं लेखक मानत असावा; ते रोचक/महत्त्वाचं वाटतं की नाही, हे वाचक ठरवेल. लेखक-वाचक या संज्ञांमध्ये सर्व कला निर्माण करणारे व तिचा अनुभव घेणारे गृहीत आहेत. प्रश्न दुसऱ्याने काही(ही) म्हटलं तर मला चालणार आहे का, असा आहे. 'चालणार आहे का?' म्हणजे 'पटणार आहे का?' असा अजिबात नाही. तो-तो लेखक 'माझ्या'सारख्या जबाबदारीने लिहीत नसेल, असं समजण्याचा मला अधिकार नाही.

विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य निरपवाद हवं. आणि हे मरण्याचं म्हटलं तरी लेखकाचं खरं आणि कलाआयुष्य जपणं ही केवळ त्या-त्या लेखकाची नाही; तर आपल्यासारख्या सर्व लेखक-वाचकांची, समाजाची जबाबदारी आहे.

त्याबरोबरच कोणत्याही परिस्थितीत हिंसादेखील

निरपवादपणे निंद्यच. विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य जपण्याने हिंसेला खतपाणी मिळणार असेल तर काय, हा प्रश्न मग येतो. हीच खरी शृंगापत्ती नव्हे काय?

विनोदाचंही पाहायला हवं. विनोद हिंसक होऊ शकतो. बहुतेकदा होतोही. शिवाय त्यात इतरांना मूर्ख ठरवण्याचा एक पवित्रा असतो. बहुतेकदा 'लाफिंग ॲट' होतं, 'लाफिंग विथ' नाही. कलेमध्ये इतर तऱ्हेचे धोकेही असतात. विदारक दर्शन कधी कधी आत्मकरुणा गोंजारवणारं ठरू शकतं आणि उपयोजित संगीत गुंगवणारं ठरू शकतं. अशा सर्व धोक्यांचा सामना लेखक-वाचकाला करावाच लागतो. तेव्हा प्रश्न फक्त विनोदाचा नाही.

असं पाहा... तुमच्या मूर्तीला, म्हणजे तुम्ही ज्यांना अपार मानता अशा कुणालाही- असं टार्गेट केल्याची कल्पना करा. नागडं-उघडं केल्याची कल्पना करा. रक्त खवळेल ना? मध्यंतरी नेहरू-आंबेडकर व्यंगचित्रावरून वादंग उठलंच होतं. पण त्या व्यंगचित्रात टवाळी नव्हतीच. (अर्थात हेही फक्त एका वाचकाचं, माझं मत झालं!) 'शार्ली'वाल्या व्यंगचित्रांमध्ये विखारही आहे. विखारी लिहिण्याचा हक्कही विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्यात अनुस्यूत असायला हवा ना? प्रश्न अधिक बिकट होतो त्याने.

आपण 'न वाचता', 'न बघता' याबाबत भूमिका घेऊ शकतो का? नेहमी म्हटलं जातं त्याच्या उलट मला म्हणायचं आहे. म्हणजे उदाहरणार्थ- 'पीके' बघा, मग टीका करा- असं म्हटलं जातं. पण पेरुमल मुरुगन यांची 'मधोरूबगन' न वाचताही त्यांना ती लिहून छापण्याचा हक्क आहे, असं मानायला नको का?

आनंद यादव यांच्या 'संतसूर्य तुकाराम'वर कुणी फार काही प्रखरपणे बोललं नाही. त्यांची गत मुरुगनांसारखीच झाली. यात वारकरी मताचा आदर राखला गेला. एका गटाची दहशत बसली की, लेखक-वाचकांनी लढा देण्याइतपत हे लिखाण उच्च दर्जाचं आणि म्हणून महत्त्वाचं मानलं नाही? म्हणजे यात कलात्मक मूल्य इत्यादी आलं. उदाहरणार्थ- तेंडुलकरांच्या 'सखाराम बाइंडर', 'गिधाडे', 'घाशीराम कोतवाल'च्या बाबतीत नाटकवाल्यांनी सेन्सॉरशी लढे दिले; पण त्या कलाकृती चांगल्या कलाकृती होत्या, असाही त्यांचा दावा होता. पण विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य हा चांगल्या नसलेल्या कलाकृतीच्या लेखकाचाही हक्क नाही काय?

अश्लीलता (व्हल्गॅरिटी), बीभत्सपणा (ऑब्सीनिटी), अभिरुची (टेऽस्ट) या गोष्टी संस्कृतिसापेक्ष, स्थल-कालनिष्ठ तर असतातच. 'एआयबी'वरही वादंग सुरू आहे. 'काय फरक पडतो', 'आवडत नसेल तर पाहू नका', 'हे मित्र-मैत्रिणींसमोर चालेल, पण आया-बहिणींसमोर नको', 'कुठे काय झालं?' अशा असंख्य प्रतिक्रिया येत आहेत. त्यानंतर बीबीसीच्या वृत्तचित्राचा प्रश्न!

करमणूक आणि कला (अशा दोन गोष्टी मानल्या तरी) पेक्षाही धर्म व राजकारण (अशा दोन गोष्टी मानल्या तरी) यातले प्रश्न अधिक झोंबणारे होतात, असं (मला) वाटतं. राजकीय मतस्वातंत्र्याचा प्रश्न आहेच आहे. कम्युनिस्ट राजवटीमध्ये राजकीय मतस्वातंत्र्य नाही, पण लोकशाही देशांमध्ये मात्र कम्युनिस्ट चळवळीतले लोक हे स्वातंत्र्य पुकारताना दिसतात. लोकशाही हे स्वातंत्र्य कबूलच करते, पण इथे एक विरोधाभास आहे. सर्वांना सारखा न्याय हवा आणि तो न्याय असेल तर तो सर्वत्र हवा.

मुरुगनांनी आत्महत्येची घोषणा करून सर्व लेखक-वाचकांची पूर्ण गोची केली आहे. आता काय करायचं काय? उत्तर देण्यापेक्षा प्रश्न नीट मांडणं महत्त्वाचं मानलं जातं. पण इथे उत्तर दिलंच पाहिजे. पण ते देऊन टाकता येणार नाही. चर्चा हवी. सामाईक निर्णय घेता येईल का? निदान कलावंतांनी एकत्र यायला हवं, निःसंदिग्धपणे बोलायला हवं. पण कुठे आणि कसं एकत्र यायचं?

आता अश्लीलतेचं, हिंसेचं वा शिव्यांचं पुराणमतवाद्यांनाही काही वाटत नाही, असं म्हणेपर्यंत पेहेलानी आले! राजकीय आणि धार्मिक बाबीत मात्र सर्वच सामाजिक गट संवेदनशील, सावध व दक्षही असतात. आता एकविसाव्या शतकामध्ये या बाबतीतच मुस्कटदाबी अधिक होताना दिसते.

या टिपणाचा शेवट कसा करावा? असो वा लेखनसीमा म्हणून चालणार नाही. या बाबतीत भारतीय संविधानातल्या संबंधित कलमांचीही चर्चा व्हायला हवी. पण एक भूमिकाही घोषित करायला हवी. मी विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या बाजूने आहे. विज्ञानात काही मांडताना 'all other things remaining constant' असे शब्द योजतात. मेख तिथेच आहे.

**राजीव नाईक**
मुंबई
rnaik35@gmail.com

# भालचंद्र नेमाडे यांची मुलाखत

भालचंद्र नेमाडे. सन २०१४ चा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना घोषित झालेला आहे. मराठीतील चर्चित, वाचकप्रिय आणि स्वत:च्या विचारांवर ठाम राहणारे कादंबरीकार, कवी, समीक्षक, विचारवंत असे भालचंद्र नेमाडे. वयाच्या २५ व्या वर्षी 'कोसला' ही कादंबरी लिहून त्यांनी मराठी साहित्यात खळबळ माजवली होती. सगळा महाराष्ट्र त्यांना 'कोसला'कार म्हणून संबोधू लागला. इतक्या कमी वयात मिळालेली ही प्रसिद्धी त्यांच्या डोक्यात गेली नाही. त्यांचे पाय जमिनीवरच राहिले. ते 'कोसला'ला धरून बसले नाहीत. त्यांनी पुढच्या काळात अनेक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांत 'बिढार', 'हूल', 'जरीला', 'झूल', 'हिंदू' यांचा समावेश आहे. त्यांचे मेलडी' आणि 'देखणी' हे कवितासंग्रहही आहेत. समीक्षेच्या क्षेत्रातही त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. त्यात 'टीकास्वयंवर', 'साहित्याची भाषा', 'तुकाराम', 'दी इन्फ्ल्युअन्स ऑफ इंग्लिश ऑन मराठी- ए सोशिओलिंग्विस्टिक अँड स्टायलिस्टिक स्टडी', 'इंडो-अंग्लोयन रायटिंग्ज- टू लेक्चर्स', 'नेटिविझम' हे ग्रंथ प्रमुख आहेत. त्यांना मराठी लेखनासाठी अनेक सन्मान मिळालेले आहेत. त्यांच्या 'टीकास्वयंवर' ह्या समीक्षाग्रंथाला १९९१ मध्ये 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार प्राप्त झाला. दोन वर्षांपूर्वी त्यांच्या 'हिंदू' या कादंबरीच्या प्रथम खंडाचे प्रकाशन झाले. पहिल्याच वर्षी त्याच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या. आता ती कादंबरी हिंदीमध्येही प्रकाशित झालेली आहे. या वर्षी डॉ.भालचंद्र नेमाडे यांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' जाहीर झालेला आहे.

भालचंद्र नेमाडे आपल्या उपहासात्मक आणि दबंग शैलीसाठी प्रसिद्ध आहेत. ज्ञानपीठ पुरस्काराच्या घोषणेबाबत प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, 'माझे काही मित्र मला एक एप्रिलला तुला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला असं सांगून एप्रिल फूल करीत असत. आज एक एप्रिल तर नाहीये ना... मी हे प्रथम पाहिलं.

भालचंद्र नेमाडे यांचा जन्म महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्याच्या एका छोट्याशा गावी डोंगर सांगवी इथं २७ मे १९३८ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण गावातच झालं. बी.ए. पदवी त्यांनी पुण्यातून मिळविली आणि मुंबईतून एम.ए. केलं. मग विविध शहरांतून त्यांनी अध्यापनाचं काम केलं आणि मुंबई विद्यापीठातून निवृत्त झाले. इंग्रजीचे प्रोफेसर असूनही 'इंग्रजी शिक्षण बंद करावं,' या मताचे ते आहेत. मराठीतून लिहिणाऱ्यांमध्ये ते ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे चौथे साहित्यिक आहेत. त्यांत पहिले वि.स.खांडेकर, मग वि.वा.शिरवाडकर आणि त्यानंतर विंदा करंदीकरांना ह्या सन्मानाने गौरवण्यात आले आहे.

मुंबईमध्ये डॉ.भालचंद्र नेमाडे यांची भेट नुकतीच झाली. त्यांच्याशी केलेली ही बातचीत.

**प्रश्न–** आपण सुरुवात 'हिंदू'पासूनच करू या. आपण 'हिंदू'ला जगण्याची समृद्ध अडगळ असं म्हटलंय. तुम्ही 'जगण्याची समृद्ध अडगळ' यांद्वारे काय सांगू इच्छिताय...?

– या आशयाचं सूत्र माझ्या मनात खूप दिवसांपासून घुमत होतं. आपलं छोटंसं गावं जरी बघितलं तरी त्यात दहा-पंधरा संप्रदाय आढळतात. कुणी फकीर आहे, कुणी नाथपंथी आहे. गोसावी, वारकरी, महानुभाव, कबीरपंथी इत्यादी संप्रदाय आढळतात. जातीदेखील खूप आहेत. त्यांचं खाणं-पिणं, राहणं-वागणं, पोशाख सगळं वेगवेगळं आहे. त्यांची व्रतवैकल्ये आणि सणवारदेखील वेगवेगळे आहेत. लोककथा आणि लोकसाहित्यदेखील भिन्न-भिन्न आहेत. त्यांचं सादरीकरण होतं, काही कलाकार असतात. मी इंग्लंड, जर्मनी या देशांतून असं पाहिलं की, त्यांच्याकडे इतकी समृद्धी असत नाही. त्यांच्याकडे अशी लोकगीतं, लोककथा, लोककला असत नाहीत. आपल्या देशात ही जी लोकसमृद्धी आहे, ती खूप महत्त्वाची आहे. पण आपली समृद्धी इतकी जास्त आहे की- कित्येक वेळा वाटतं की, या सगळ्याचं काय करावं? अशा स्थितीत नायकाला वाटतं की, पुढे जायचं



असेल तर हे सगळं बरोबर घेऊनच जायला हवं किंवा हे सोडून तरी द्यायला हवं. जर ते टाळून पुढं गेलं, तर आमची समृद्धी तितकी कमी होते. मग समृद्धीशिवाय प्रगती तरी कशी करणार? नायकाच्या मनात नेहमी असा प्रश्न येतो की, जीवनात आधुनिकतेचा स्वीकार केला तर या लोकसमृद्धीचं करायचं काय? जी आज उपयोगाची नाही आणि ती टाकूनही देता येत नाही. त्यामुळे मी 'हिंदू'ला उपशीर्षक दिलंय- 'जगण्याची समृद्ध अडगळ'. हिंदू समाजाचं असंच काही तरी झालंय. आम्ही आमच्यापूर्वीच्या रीती-रिवाजांना सोडूही शकत नाही... जशी आमच्या स्वर्गात गेलेल्या आजोबांची काठी आहे... आजीची पेटी आहे. अशा किती तरी वस्तू... ज्यांचे केवळ प्रतिक म्हणूनच आपल्या जीवनात स्थान आहे. त्याशिवाय आणखी काहीही उपयोग नाहीये. प्राचीन संस्कृतीची काही वैशिष्ट्ये आहेतच. प्रगतीसाठी त्यांची गरजही भासू शकते. पण आपल्यापुढे एक आव्हानही आहे की, आपल्याला मंगळावर, चंद्रावरही जायचं आहे आणि आज गावात आपण गाई-बैलाची पूजादेखील करतो आहोत. तर, या सगळ्या गोष्टी बरोबरीने किती काळ चालणार?... पण भारताची हीच ओळख आहे.

**प्रश्न-** तुमची किती तरी पात्रं परंपरा तोडतात. त्यात चिंटूआत्यादेखील आहे, जी आपल्या पतीचा खून करते. तुम्ही या माध्यमातून काय सांगू इच्छिताय?

- यातील एक सूत्र मातृसत्तेचं आहे. ही जुनी हिंदू परंपरा आहे. ही परंपरा आर्य आल्यानंतर कमी-कमी होत गेली आणि मग पितृसत्ताक व्यवस्था आली. आमची कालिमाता, अंबा, तुळजाभवानी या आमच्या मूळ देवता आहेत. नंतर राम, कृष्ण आले. ते नंतर पितृसत्ताकाचे प्रतीक बनले. पण आपल्यासाठी अजूनही मातृसत्ताकच पूजनीय आहे. माझा नायक तर पुरातत्त्ववेत्ता आहे. त्यामुळे तो सगळ्या गोष्टींचा ऊहापोह करतो. पुढच्या खंडात हे सगळं अजून विस्ताराने येणार आहे. वर्तमानात स्त्रियांची जी स्थिती आहे समाजात, ती चांगली नाहीये. स्त्रियांना भयंकर अत्याचारांचा सामना करावा लागतोय, ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे. चिंटूला केवळ मुलीच होतात म्हणून तिला घटस्फोट देणं आणि आपण दुसरं लग्न करणं, हे बरोबर नाही. पण आपल्या समाजात हे सगळं खूप चालत आलेलं आहे. आज जे मुलींचं प्रमाण कमी झालेलं आहे, त्याच्यामागे हीच मानसिकता आहे. यावर एकच उपाय आहे की, आपल्याला मागे जाऊन पुन्हा मातृसत्ताक पद्धत सुरू करावी लागेल. हे एक आव्हान आहे. त्यामुळे माझ्या कादंबरीत असं एक पात्रं आलं आहे की, जे मातृसत्ताक पद्धतीला पाठिंबा देते आहे. त्यामुळे वर्तमान व्यवस्था त्याला नष्ट करू इच्छितेय. त्याचा मृत्यू नक्की आहे. त्याची कबरही खोदली गेलीय. ती असा विचार करते की, आपण शरण का जायचं? त्यामुळे ती विद्रोह करते. त्यासाठी दुसऱ्या स्त्रिया तिला मदत करतात. सहनशक्तीची मर्यादा संपली की, हे सगळं घडतंच.

**प्रश्न-** नायक खंडेरावाच्या माध्यमातून आपण ज्या गोष्टी मांडल्या आहेत, त्या...

– सगळ्या गोष्टी समांतर चालतात. खंडेरावचा जन्म एका छोट्या समूहात होतो. आणि त्याला नव्या जगात जायचं आहे. तो किशोरावस्थेत आहे. पहिल्या खंडात तो विरोधाभासामध्ये जगतोय. तो परंपरा आणि विकास यांच्यामधे उभा आहे. त्यामुळे त्याच्या मनात द्वंद्व आहे.

**प्रश्न–** तो केवळ 'हिंदू धर्मा'विषयीच विचार करीत नाहीये. तुमच्या या कादंबरीच्या केंद्रस्थानी वर्तमान आणि प्रगतिवादी विचारदेखील आहे... तुम्ही अध्यात्म आणि धर्म यांमध्ये कशा तऱ्हेने फरक करता?

– मी 'धर्म' शब्दाला मानत नाही. आम्ही पूर्वी धर्माबद्दल बोलत नव्हतो. एखाद्या म्हातारीला धर्माबद्दल विचारलं, तर ती आश्चर्यचकित होईल... 'धर्म काय असतो?' तिला पंथ, संप्रदाय माहितीय... धर्म या शब्दामुळे एक चर्च, एक पोप, एक प्रॉफेट किंवा बायबल, कुराण यांचा बोध होतो. आपल्याकडे असं नाहीए. आमच्याकडे ज्ञानेश्वर होते... ते ब्राह्मण होते आणि त्यांच्यानंतर तुकाराम, नामदेवही होते. वेगवेगळ्या जातीतील लोकांनी आपल्याला मार्ग दाखवला आहे. प्रत्येक जातीतील एक आदर्श आमच्यासमोर आहे. धर्माचं भूत इंग्रजांनी आमच्या मानेवर बसवलंय... धर्माचं हे भूत नष्ट व्हावं, अशीही माझी इच्छा आहे.

**प्रश्न–** तुम्ही ईश्वराला मानता?

– नाही. मी ईश्वराला मानत नाही, पण माझं न मानणं शंकराचार्यांसारखं आहे. तेदेखील मानत नव्हते. त्यांच्याप्रमाणेच माझं ईश्वराला न मानणं आहे, असं मी समजतो. सांख्य, कपिल हेदेखील ईश्वराला मानत नव्हते. त्यांच्याप्रमाणेच माझेदेखील विचार आहेत. पण आपण ब्रह्माला मानतो. आमची काही आदर्श व्यक्तिमत्त्वे आहेत... त्यांना मी मानतो. सृष्टी आहे... अशा ईश्वर न मानणाऱ्यांपैकी मी एक आहे.

**प्रश्न–** तुम्ही मंदिरात जात नाही... पूजापाठ करीत नाही?

– मी मंदिरात जातो. सगळे जातात म्हणून जातो. आस्था असणाऱ्यांवर माझा विश्वास आहे... कर्मकांडांवर नाही. पूजापाठ करणाऱ्यांना माझा विरोध नाही. उलट, त्यांच्याशी जोडून घेऊन मी स्वत:ला आतून बलवान झाल्याचा अनुभव करतो. माझी हीच कमजोरी आहे की, मी ईश्वराच्या संकल्पनेवर विश्वास ठेवू शकत नाही. जे श्रद्धा ठेवतात, त्यांच्याविषयी मला आस्था वाटते.

**प्रश्न–** तुमच्या लेखनात तुम्ही किती तरी वेळा खूप तिखट प्रतिक्रिया व्यक्त करता. असं वाटतं की, तुम्ही रागावलेले आहात; चिडून बोलताय...

– सहज-स्वाभाविक प्रतिक्रियेच्या रूपात जे येतं, ते मी तसंच अभिव्यक्त करतो. जाणून-बुजून मी कुणाही व्यक्तीला किंवा समुदायाला ठेच लागेल, असं काहीही करीत नाही.

**प्रश्न–** तुमच्या कादंबरीत तुम्ही किती असता?

– बहुतेक कादंबरीत मीच आहे. कधी नायकाच्या रूपात, तर कधी इतर रूपात.... टक्केवारीत सांगणं अवघड आहे. पण कुठे ५० टक्के, कुठे ६० टक्के किंवा ७० टक्के... कधी कधी तर ९० टक्क्यांपर्यंतही माझे अनुभव कादंबरीत प्रतिबिंबित झाले आहेत.

**प्रश्न–** कादंबरी लिहिताना तुमच्या मनातील एखादं पात्रं तुम्हाला प्रभावित करून जातं?

– लिहिता-लिहिता तुम्ही एखाद्या पात्रामुळे इतके प्रभावित होता की, तुमच्यामध्ये त्यामुळे परिवर्तन घडून येतं. हे असं माझ्या बाबतीतही घडून आलेलं आहे.

**प्रश्न–** तुम्ही देशीवादाचे पुरस्कर्ते मानले जाता. महात्मा गांधींच्या स्वदेशीपेक्षा तुमचा देशीवाद किती वेगळा आहे?

– गांधीजींचा प्रभाव माझ्या विचारांवर आहेच. तसा मी स्वत:ला लोहियांचा शिष्य मानतो. मी त्यांना कधीही भेटलेलो नाही... पण मी त्यांना खूप गंभीरपणे वाचलेलं आहे. मी गांधीजी, लोहियाजी, साने गुरुजी, विनोबाजी यांची परंपरा मानतो. राजनीती आणि सामाजिक संदर्भात मी त्यांचा प्रभाव मानतो. पण लहानपणापासून माझ्यावर लोकसाहित्याचा खूप प्रभाव आहे. माझ्या विचारांचा पायाच देशीवाद हा आहे. जेव्हा विदेशी परिस्थितीशी दोन हात करायची वेळ आली, तेव्हा मी माघार घेतलेली आहे. उदाहरणार्थ, रोजीरोटीसाठी मला इंग्रजी शिकवावी लागली. दुसरा पर्याय मला त्या वेळी सुचला नाही. पण त्याचा उपयोगही मी माझी मातृभाषा समृद्ध करण्यासाठी करून घेतला. मी हेही मानतो की, देशाबाहेरून एखादा विचार आला तर त्याचा उपयोग पायाभूत पद्धतीने करायला हवा.

**प्रश्न–** तुम्हाला अस्तित्ववादी लेखक म्हणूनही ओळखलं जातं. कोणत्या वादाचा तुमच्यावर प्रभाव आहे?

– लेखनाच्या क्षेत्रात वाद येतात आणि जातात. १९६० च्या नंतर लेखक आपापसात चर्चा करत असत.

देशातील-विदेशातील कोणत्याही प्रश्नावर, वादावर आम्ही चर्चा करीत असू. दोस्तोवोस्की, कामू, काफ्का आम्ही वाचले. पश्चिमेतील जर्नल्सदेखील वाचली. पण या सगळ्या गोष्टी आम्ही आमच्या आसपासचा माहोल विचारात घेऊन आत्मसात केल्या. अस्तित्ववाद ही पाश्चिमात्य संकल्पना आहे. आमचा अस्तित्ववाद कबीर, तुकाराम यांचा आहे. आमचे हे विचारवंत परमेश्वरावर निर्भर नव्हते; ते स्वत:वर विश्वास ठेवून आपली वाटचाल करीत असत.

**प्रश्न–** साहित्यातील प्रगतिवाद, वामपंथ इत्यादी विचारधारांशी तुम्ही कशा प्रकारे संबंध ठेवता?

– ह्या सगळ्या गोष्टी मला कधीच भावल्या नाहीत. त्यात ज्या चांगल्या गोष्टी होत्या, त्या मी जरूर घेतल्या. पण या वादांनी मला कधीही आकर्षित केलं नाही; माझ्यावर प्रभाव टाकला नाही.

**प्रश्न–** तुम्ही छोट्या गावांतून आलात, आता महानगराशी जोडलेले आहात; त्यामुळे कधी कोणत्या प्रकारचा संघर्ष उद्‌भवला?

– एक प्रकारचा ताण तर असतोच. मी परदेशातही मोठमोठ्या शहरांतून राहिलोय. लंडन, बीजिंग, पॅरिस, फ्रँकफर्ट इत्यादी शहरांतून मी इंग्रजीचं अध्यापन केलंय. पण मी जिथे कुठे राहिलो, तिथे मी ग्रामीण आहे, असाच अनुभव येत राहिला. मी गावातल्या व्यक्तीप्रमाणेच वागतो. सिमला निवासमध्ये तर तिथले ग्रामीण लोक म्हणतात की, मी त्यांच्याप्रमाणेच वागतो. मी गावांपासून वेगळा झालोय, असं मला कधीही वाटलं नाही.

**प्रश्न–** तुम्ही सुरुवातीला कविता लिहिल्यात, पण आता मात्र कविता लिहीत नाही...

– कविता लिहिण्यासाठी एक प्रकारचा मॅडनेस असावा लागतो. पण मी कविता लिहितो. माझे दोन संग्रह प्रकाशित झाले आहेत. नवा संग्रहही लवकरच येईल.

**प्रश्न–** आजकाल साहित्याला वेगवेगळ्या कप्प्यांत ठेवण्याची पद्धत आहे. दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, अल्पसंख्याक, आदिवासी साहित्य... तुम्ही याकडे कसे बघता?

– हे सगळं अशास्त्रीय आहे. यात खूपसा जातिवाद येतो. भेद होतो.

**प्रश्न–** असं मानतात की– दलित आपली बाजू, स्त्रिया त्यांची बाजू अधिक चांगल्या तऱ्हेने मांडू शकतात...

– मी असं मानत नाही. संवेदनशीलता खूप महत्त्वाची भूमिका बजावत असते. कधी कधी या सगळ्यांशी जोडलं गेलेलं राजकारण अडचणीची परिस्थिती उत्पन्न करते. स्त्रीवादी साहित्याची गोष्ट असते तेव्हा.... प्रत्येक मानव अर्धनारीश्वर आहे. त्यामुळे तो एक-दुसऱ्याचे अनुभव योग्य तऱ्हेने व्यक्त करू शकतो. प्रतिभेचा अर्थच हा आहे की, आपण सजीव, निर्जीव... सर्व परिस्थितीचे सार्थक, सजीव चित्र रेखाटू शकलो पाहिजे.

**प्रश्न–** बहुतेक मराठी लेखकांनी आत्मकथा लिहिल्या आहेत. तुमची तशी काही योजना?

– मी आत्मकथेच्या विरुद्ध आहे. आपण आत्मकथा लिहिली पाहिजे, असं मला कधीही वाटलं नाही. आत्मकथेमध्ये लेखक आपल्या जीवनाला सीमित करतो. तो आपलं एकांगी चित्रण करतो. त्याचं खरं रूप प्रकट होत नाही. आपलं सगळ्यांचं अचेतन मन एकसारखंच आहे. परा-पश्यंतीशी आम्ही जोडले जातो. माझा विचार केवळ माझ्या एकट्याचा असत नाही; त्याची व्याप्ती खूप अधिक असते. आत्मकथेत बहुतेक करून खूप काटछाट केलेली असते. कादंबरीमध्ये असं होत नाही. कादंबरीत पूर्ण विस्तार करता येतो.

**प्रश्न–** मराठीतील कोणत्या साहित्यकृती आपण महत्त्वपूर्ण मानता?

– मराठीमध्ये आजकाल कादंबऱ्या खूप चांगल्या येत आहेत. वीसएक चांगले कादंबरीकार आहेत. रंगनाथ पठारे, राजन गवस, सदानंद देशमुख, महेंद्र कदम, विदर्भातील नामदेव कांबळे आदी लेखक महत्त्वाचे आहेत. त्यांना कादंबरीचं सूत्र सापडलेलं आहे. ते कादंबरीची रचना, आशय आणि प्रयोगशीलता यामध्ये खूप पुढे गेलेले आहेत.

**प्रश्न–** भारतीय साहित्यात– विशेषत: हिंदी साहित्यात– तुम्हाला उल्लेखनीय कोण वाटतं?

– हिंदी मी मुळातून वाचतो... हिंदी कविता आणि कादंबरी मला प्रभावित करते. हिंदीचा अँटेना खूप मोठा आहे. हिंदीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात जनजीवनाचं प्रतिबिंब पडलेलं आपल्याला दिसतं.

**प्रश्न–** कुणी विशेष लेखक?

– फणीश्वरनाथ रेणू यांची कादंबरी 'परती-परिकथा' माझ्या मनाला स्पर्शून गेली. नागार्जुन, प्रेमचंद, उदयप्रकाश, धूमिल यांचं साहित्य मला खूप भावतं.

**प्रश्न–** एक थोडा वेगळा प्रश्न... तुम्ही इंग्रजीचे प्रोफेसर होतात. मग अभिव्यक्तीसाठी तुम्ही मराठी भाषा

का निवडलीत?... काही खास कारण?

– आपल्या मातृभाषेत आपण शंभर टक्के अभिव्यक्त होऊ शकतो. अनुभूती मातृभाषेत होते आणि अभिव्यक्तीचं श्रेष्ठ माध्यमही मातृभाषाच असते. मी अकरावीपर्यंत मातृभाषेतच शिकलो. नंतर मी इंग्रजीचा अभ्यास केला आणि ती भाषा शिकविलीही. जगभरातलं साहित्य वाचल्यावर माझ्या असं लक्षात आलं की, दुसरी भाषा समजून घेण्यासाठी आपल्याला अनुवादाच्या प्रक्रियेतूनच जावं लागतं. मग आपल्या भाषेतच का लिहू नये? अधिक वाचकांनी माझं साहित्य वाचावं म्हणून किंवा रॉयल्टीच्या मोहापोटी मी भाषेबरोबर कधीही तडजोड केली नाही.

**प्रश्न–** तुम्ही इंग्रजीचे प्राध्यापक होतात, पण शाळेत इंग्रजीतून शिकविण्याला तुमचा नेहमीच विरोध राहिला आहे; असं का?

– माझा इंग्रजीला विरोध असल्यामागे कारण आहे. इंग्रजी चांगलं यायचं असेल तर ते मातृभाषेच्या माध्यमातूनच येऊ शकतं. मी केवळ भावनेच्या भरात हे म्हणत नाहीये. भाषाविज्ञान हादेखील माझा अभ्यासाचा विषय होता. त्यातील मूळ सिद्धांत असा आहे की, तुम्ही मातृभाषेतच चांगल्या प्रकारे विचार करू शकता. सृष्टीचं आकलन मातृभाषेतच चांगल्या प्रकारे होऊ शकतं. जगातील प्रत्येक देशाची याला मान्यता आहे. केवळ जे देश गुलाम होते, त्या देशांमध्येच इंग्रजीचं प्रचलन आहे. त्यामुळे आमचा विकासदेखील होत नाहीये. माझं म्हणणं बौद्धिक विकासाशी संबंधित आहे. करोडो लोक शिकले, पण एकही नवी गोष्ट आम्ही जगाला देऊ शकलो नाही. चिकित्सा, विज्ञान या विषयांत आमचा शोध जवळजवळ नसल्यातच जमा आहे. याचं कारण आमच्या देशातील इंग्रजी हेच आहे.

**प्रश्न–** अशी परिस्थिती इंग्रजांचे गुलाम असलेल्या सगळ्या देशांची असणार?

– आमचं थोडं तरी बरं आहे. कारण आपली अर्धी लोकसंख्या निरक्षर आहे. हे अशिक्षित लोकच काही ना काही क्रिएटिव्ह करू शकतात. जे इंग्रजीतून शिकले, ते परप्रकाशित झाले.

**प्रश्न–** समाजमनांवर इंग्रजीचा दबाव आहे...

– इंग्रजीच्या साथीला विकास आहे... ही एक प्रकारची अंधश्रद्धा आहे. मी नरेंद्र दाभोलकरांना म्हटलं होतं की, ह्याचा समावेशही अंधश्रद्धांच्या यादीत करा. जागतिकीकरणामध्ये तुम्ही अधिकाधिक विकले जात आहात. इंग्रजीचं तत्त्वज्ञानच स्थलांतरवादी आहे. ऑस्ट्रेलिया, अमेरिका, कॅनडा, दक्षिण अमेरिका येथील भाषा इंग्रजीने संपवून टाकल्या आहेत. आपण वाचलो आहोत, त्याचं कारण आपली अर्धी लोकसंख्या निरक्षर आहे म्हणून.

**प्रश्न–** तुम्ही दाभोलकरांचा उल्लेख केलात... पण अंधश्रद्धेला विरोध करणाऱ्यांना संपवण्यासाठी काही शक्ती सक्रिय झाल्या आहेत...

– ते सगळे इंग्रजीमुळे प्रभावित झालेले लोक आहेत. ते अशिक्षित नाहीत, ते प्रशिक्षित–फॅसिस्ट प्रवृत्तीचे लोक आहेत. ते विकले गेलेले आहेत. गोविंद पानसरे हेदेखील त्यांची शिकार झाले आहेत.

**प्रश्न–** इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वाचनसंस्कृतीवर काय परिणाम होताना तुम्ही पाहताय?

– मी असा विचार करतो की, आमची वाचनसंस्कृती खूप जुनी नाहीए. लेखन–वाचनाचा आमचा इतिहास दोन हजार वर्षांपूर्वीचा नाहीये. आमची परंपरा मौखिकच आहे. लिपीचा शोध लागल्यानंतरही आमची मौखिक परंपराच गावांतून चालू राहिलेली आहे. आणि तसंही इलेक्ट्रॉनिक माध्यमं हेही अभिव्यक्तीचंच एक माध्यम आहे. मोठी कादंबरी आपण यापुढे नेटवर वाचू शकू. ई–बुकचा प्रसारही वाढू शकतो. भाषेचे वय ६० हजार वर्षे आहे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाचं वय २०–३० वर्षच आहे. कदाचित मानवजात पुन्हा मौखिक परंपरेला आपलं मानू लागेल.

**प्रश्न–** तुमच्या पात्रांतील कुणी समाजातील ओळखीचा 'चेहरा' वाटतो– ज्याला पाहून लोक म्हणतील की, हे नेमाडे यांच्या कादंबरीतील पात्र आहे...

– हो, तसं आहे ना! किती तरी पात्रं आहेत. गावातील सगळ्या लोकांना माहितीय की, कादंबरीतील एक पात्र माझ्या वडिलांचंच आहे. पण ते गावातील लोकांना नेहमी म्हणत असत की, कादंबरीतील पात्रं ही काल्पनिक असतात. खऱ्या जीवनातील व्यक्ती साहित्यात कशी येऊ शकते?... अशी किती तरी उदाहरणं आहेत.

**डॉ. दामोदर खडसे**
धायरी, पुणे ४१.
Mob. : 9850088496

**हिंदीतून मराठी अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ**
अंधेरी (प.), मुंबई ५८.
Mob. : 9867812898

# धर्मांधांच्या हातांतून धर्माला सोडवा

सॉक्रेटिसने ज्ञान मिळवण्यासाठी तीन पायऱ्यांचा मार्ग सांगितलाय. आयडेंटिफाय युवर डॉग्माज : तुमच्या धारणा म्हणजे पक्के विचार समजून घ्या. क्वेश्चन युवर डॉग्माज : त्यांना प्रश्न विचारा आणि खरं-खोटं जाणून घ्या. आणि रिकन्स्ट्रक्ट युवर डॉग्माज : तुमच्या ज्या धारणा तकलादू निघतील, त्यांच्या जागी नव्या धारणा उभ्या करा. आजच्या परिस्थितीत मी धर्माच्या बाबतीतल्या माझ्या धारणा तपासून घ्यायचा प्रयत्न करीत आहे.

आमचे चंदूभाऊ म्हणजे चंद्रकांत वानखडे हे पुरोगाम्यांचं धर्माविषयीचं वागणं गाय आणि गोचिडीचं उदाहरण देऊन सांगतात. हिंदुत्ववाद्यांमधले धर्मांध गोचिडीसारखे हिंदूवर म्हणजे गाईच्या पाठीवर चिटकून बसलेले आहेत. आमचे पुरोगामी गोचिडीला काढून टाकण्याऐवजी गोचिडीला मारण्याच्या नावाने गाईलाच बदडत आलेत. त्यामुळे गाईला राग येऊ लागला तो मारणाऱ्यांचा आणि रक्त शोषणारा परजीवी गोचीड मात्र आपला वाटू लागला. हिंदुत्ववाद्यांना आणि त्यातल्या धर्मांधांना उघडं पाडण्याऐवजी पुरोगामी मंडळी हिंदू धर्मालाच नावे ठेवू लागली. हेच जगभरातल्या मुस्लिम आणि ख्रिश्चनांमधल्या पुरोगाम्यांचंही झालं असावं. सर्वसामान्यांना धर्माचा आधार वाटतो. त्याच्याशी ते आपलं अस्तित्व बांधून ठेवतात. त्यांचं सगळं जगणंच धर्माशी आणि धर्मश्रद्धेशी जोडलेलं असतं. पुरोगाम्यांनी तो आधार त्यांच्यापासून खेचून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सर्वसामान्यांनी धर्म अधिकच कवटाळून घेतला. त्याचा फायदा धर्मांधांना होत आला आहे.

धर्माच्या पलीकडे जाऊन केवळ माणूस बनायचं ध्येय चांगलंच आहे. पण बहुसंख्य पुरोगामी माणूसही बनले नाहीत आणि त्यांच्या हातातलं धर्म नावाचं हत्यारही कायमचं निसटून गेलं; हाती राहिलं पोथ्यांचं धुपाटणं. धर्माला नाकारण्याचं तत्त्वज्ञान थोरच आहे. भौतिकतावादाची पार्श्वभूमी, तर्क आणि विवेक यांचाही सन्मान व्हायलाच हवा. धर्माला सत्ता आणि शस्त्राची जोड मिळाली की त्याचं किळसवाणं रूप घाबरवून टाकणारंच आहे, हे तर त्रिवार मान्य. हे सगळं खरं असलं तरी धर्म नाकारल्यावर पुरोगामी मंडळी धर्माला आपलं मानणाऱ्यांपासून लांब गेली. आजही जात आहेत. त्याची इतरही अनेक कारणं आहेत. पण धर्म नाकारणं हे त्यातलं एक मुख्य कारण आहे. धर्म ही अफूची गोळी ठरवणाऱ्यांपैकी बहुतेकांच्या दृष्टीने सर्वसामान्य माणसं धर्मभोळी, अंधश्रद्ध, बावळट, प्रतिगामी, अविचारीच नाही तर मध्ययुगीन मानसिकतेचीही कळत-नकळत ठरवली गेली. तुच्छतावादामुळे अनेक बुद्धिवाद्यांना अहंगंडानं ग्रासलं. कुणाला आपलं म्हणावं यापेक्षा कोण आपले नाहीत, यांचीच यादी मोठी बनत गेली. त्याची प्रतिक्रिया सर्वसामान्यांमधून उमटली. पुरोगाम्यांविषयी त्यांना आदर वाटत राहिला, पण आपलेपणा संपला. आज पुरोगामी, सेक्युलर, विद्रोही, समाजवादी, कम्युनिस्ट हे शब्द बहुसंख्यांना आपले वाटत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

हिंदुत्ववाद्यांशी चाललेल्या शर्यतीत आपला पराभव झालेला आहे, हे पुरोगाम्यांनी मान्य करायलाच हवं. हे थोडं जास्त वाटत असेल तर मागे पडलो आहोत, असं म्हणावं वाटल्यास; पण टाळू नये, प्लीज. इथे मला निवडणुकांतल्या पराभवाविषयी बोलायचं नाहीय. लोकांच्या पाठिंब्यांच्या आणि त्यापुढे सांगायचं तर सर्वसामान्यांना आपलं वाटण्याच्या बाबतीत पुरोगाम्यांचे हाल बघवत नाहीत. कारण लोकांसाठी प्रामाणिकपणे सर्वस्व वाहिल्यानंतर हे घडलेलं आहे.

सर्वसामान्यांकडे बघायचा दृष्टिकोन बदलला, तरच सर्वसामान्यांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलू शकतो. हिंदुत्ववादी पक्षांना मतं दिली म्हणून कुणी धर्मांध होत नाही. दाभोलकर, पानसरेंच्या खुनाचं फक्त स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणाऱ्यांनाच वाईट वाटलेलं नाही; त्यांत स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेणारीही खूप साधी-साधी माणसं आहेत. दाभोलकर, पानसरेंविषयी ज्यांना आपलेपणा वाटला, ते आपले आणि ज्यांनी निर्लज्जपणे या खुनांचं समर्थन केलं, ते आपले नाहीत- ही सीमारेषा आता नीट समजून घ्यायला हवी. त्या धर्मांधांना सोडू नये; पण

त्याच वेळेस नव्यांना स्वीकारण्यासाठी बाहू पसरायलाच हवेत. अजूनही वेळ गेलेली नाही. फक्त त्यासाठी दोन-तीन छोट्या गोष्टी लागतील. सर्वसामान्य माणसाच्या शहाणपणावर भरवसा आणि आदर उभा करावा लागेल. तसंच माणसं बदलू शकतात, यावर विश्वास आत-आत झिरपवून पक्का करावा लागेल. कोणत्याही लेबलाच्या पलीकडे जाऊन माणसाने माणसाला साद दिली, तर दगडही ओ देतो. फक्त ती हाक मारायची ताकद कमवायला हवी.

सावंतवाडीतल्या संमेलनाच्या तयारीसाठी गोविंदराव पानसरे गोव्याला दोनदा आले होते. तेव्हा त्यांनी सांगितलेली एक गोष्ट ते नसताना खूपच महत्त्वाची वाटते आहे. ते म्हणाले होते- आपण 'कन्व्हिन्सिंग द कन्व्हिन्स्ड' आता थांबवायला हवं. म्हणजे जे पुरोगामी विचारांविषयी आधीच पक्के आहेत, त्यांच्यासमोरच आपण तेच ते विचार पुन्हा मांडत राहतो. आपल्या कार्यक्रमांना त्यामुळे त्याच त्या लोकांचं कडबोळं जमा होत राहतं. आपलं वर्तुळ विस्तारत नाहीच, उलट आकुंचन पावत जातं. तेच ते ऐकून बहुतेक 'कन्व्हिन्स्ड'ही गळू लागतात. आणि आपण नव्यांपर्यंत पोहोचत नाही. आपण नव्यांपर्यंत पोहोचायला हवं.

जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचायचं असेल तर जुन्या त्याच त्या स्टिरिओटाइप विचारांना फारसा अर्थ उरलेला नाही. त्याच्याशी आणि त्यांच्या व्यूहरचनेशी लढून कसं संपवायचं, हे धर्मांधांना नीट कळलेलं आहे. मला वाटतं, आज या महत्त्वाच्या वळणावर धर्माला स्वीकारण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही. ज्यांनी-ज्यांनी त्यांच्यात राहून लोकांमधे खऱ्या पुरोगामित्वाचे कोंभ फुलवले, त्यांपैकी कुणीच कधी धर्म नाकारला नव्हता. छत्रपती शिवाजी महाराज, तुकोबाराय, महात्मा फुले, गांधीजी, राजर्षी शाहू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गाडगेबाबा, साने गुरुजी यांपैकी कुणीच धर्माला नाकारलं नव्हतं. उलट, धर्माने त्यांच्या चिंतनाचा आणि विचारांचा मोठा भाग व्यापलेला आहे. त्यांच्यापेक्षा आपण जास्त पुरोगामी आहोत, असं कुणाला वाटत असेल, तर सॉरी बॉस... तुमचा आणि आमचा मार्ग वेगळा आहे.

काहीही करताना ते आधी स्वतःच्या डोक्यावर घासून घ्यायला शिकवतो, तो खरा धर्म. शेवटच्या माणसापर्यंत प्रत्येकाविषयी आपुलकी उभा करतो, तो खरा धर्म. सगळ्या लेबलांपलीकडे माणसाला माणूस म्हणून बघायला शिकवतो, तो खरा धर्म. त्या खऱ्या धर्माची पताका विवेकवाद्यांनी हाती घ्यायला हवी. तसे झाले तर धर्माचे ढोंग धर्म म्हणून मांडणाऱ्या धर्मांधांचे वांदे करता येतील. चिकित्सा करणाऱ्यांनी धर्माला सोडलं, त्यामुळे धर्माचं मैदान धर्मांधांच्या हातात गेलं. धर्म संकुचित होत गेला. ज्याने विवेक उभा करायचा, तो धर्मच आज अविवेकी बनला आहे. प्रेम शिकवणारा धर्म हिंसक झाला आहे. आज जर धर्म असा असेल, तर तो खरा धर्म नाहीच. खरा धर्म आम्हाला संतांनी सांगितलाय. खरा धर्म आम्हाला स्वामी विवेकानंदांनी सांगितलाय. खरा धर्म सांगणारी मोठी परंपरा आहे आपल्याकडे नचिकेतापासून ते पतंजलींपर्यंतची, वाल्मीकीपासून लोकायतांपर्यंतची, श्रीकृष्णापासून भगवान बुद्धांपर्यंतची, गोरखनाथांपासून बसवेश्वरांपर्यंतची, निवृत्तिनाथांपासून निळोबारायांपर्यंतची, नामदेवांपासून गाडगेबाबांपर्यंतची, तुकोबारायांपासून तुकडोजींपर्यंतची, जनाबाईंपासून मदर तेरेसांपर्यंतची, विवेकानंदांपासून गांधीजींपर्यंतची, जोतिबांपासून बाबासाहेबांपर्यंतची... ही सगळीच परंपरा खरा धर्म सांगत आलीय. तो धर्म व्यापक आहे, सर्वसमावेशक आहे. विवेकाला पटणारा आहे, माणुसकीचा अर्थ सांगणारा आहे. अर्थातच यात अनेक परस्परविरोध आहेत. त्यामुळे यातलं सगळंच पटेल, असं नाही. त्यातलं जे पटेल ते उचलावं, नाही पटणार ते सोडावं. पण उकिरड्यावरच्या कुत्र्यांनी लचके तोडण्यासाठी धर्माला बेवारस सोडू नये, कारण तो आपला आहे. आपल्या बापांनी तो आपल्यासाठी मांडून ठेवलाय. विचारधारा संपल्यानंतरच्या जगातल्या मोकळ्या विचारांच्या आम्हाला आमच्या भाषेत हे समजावून द्या. खरं सांगतो, आग होईल आग! मग धर्माला धर्मांधांच्या हातातून सोडवणं अशक्य नाही.

मी आज महाराष्ट्राच्या बाहेर राहतो. देशभरातले अनेक मित्र सतत संपर्कात असतात. मला जेवढं कळतं, त्यानुसार आज देश महाराष्ट्राकडे मोठ्या आशेने पाहतो आहे. देशातल्या आतापर्यंतच्या सर्वच स्थित्यंतरांत महाराष्ट्राची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. ती आजही महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्र पुरोगामी आहे की नाही, हे माझ्यासारख्या महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्याला विचारा. धर्मांधांना ज्यांचं निव्वळ असणंदेखील खुपलं, ते दोन्ही विचारवंत आजही महाराष्ट्रातले आहेत. जोतिबांच्या पुण्यात दाभोलकरांना आणि शाहूंच्या कोल्हापुरात पानसरेंना संपवलं गेलं आहे. पण म्हणून संतांनी आणि विचारवंतांनी महाराष्ट्राच्या मातीची केलेली मशागत वाया

गेलेली नाही. 'ज्ञानाचा एका', 'नाम्याचा तुका' आणि 'कबीराचा शेखा' ही आमची व्यापक परंपरा आहे. फक्त आज त्याला 'चोख्याचा भीमा' ही नवी जोड देण्याची आवश्यकता आहे. नव्या क्रांतीची ठिणगी फक्त आणि फक्त इथेच पेटली जाऊ शकते. महाराष्ट्र पुरोगामी नाही, असं पानसरेंचं वाक्य सर्वत्र सांगितलं जातं. पण ते वाक्य तेवढंच नव्हतं. महाराष्ट्र पुरोगामी होता; आज तो पुरोगामी उरलेला नाही, पण आपल्याला त्याला पुन्हा पुरोगामी बनवायचं आहे, असं पानसरेंनी सांगितलं होतं. आपल्याला त्यांचं स्वप्न वास्तवात उतरवायचं आहे. त्यामुळे महाराष्ट्र पुरोगामी नाही, हे नकारात्मक पालुपद डोक्यात ठेवून आपल्याला हताश-निराश व्हायचं नाही. धर्मांधांना तेच हवंय. ते आपण होऊ दिलं, तर धर्मांध जिंकतील आणि आमचे दाभोलकर-पानसरे हरतील. दाभोलकर-पानसरेंना मारणाऱ्यांनो, आता बस्स. पाणी डोक्याच्या वर गेलंय आमच्या. आता आमची सटकलीय. आम्ही महाराष्ट्राची पोरं आहोत. आमचा नाद करायचा नाय. आता करा फक्त उलटी गणती. दाभोलकर-पानसरेंना आम्ही हरू देणार नाही. त्यांचा विवेक सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी जिवाचा आटापिटा करू. ते हरले, तर आमचा महाराष्ट्र हरेल. महाराष्ट्राला हरवायला अजून कोणाची माय व्यालेली नाय.

आई-बाबा आणि साईबाबाची शपथ घेऊन सांगतो, ते आम्ही होऊ देणार नाही. हो, साईबाबाच. 'टाइमपास'सारख्या सिनेमाच्या डायलॉगमधे साईबाबा असेच पोहोचत नाहीत. आज साईबाबा महाराष्ट्रातल्या साध्यासुध्या लोकांच्या जगण्याचे आधार बनले आहेत. आणि कोण कुठला स्वतःला शंकराचार्य म्हणवून घेणारा दीडदमडीचा उपटसुंभ येऊन आम्हाला 'साईबाबा पुजू नका' म्हणून सांगत असेल, तर ते आम्ही ऐकून घेणार नाही. ते कुठल्या धर्मसंसदेत सांगितलं जात असेल, तर आम्ही चुलीत घालतो ती धर्मसंसद. आम्हाला बाकी काही माहीत नाही, या फकिरानं एका पडक्या मशिदीत आजचा देशातला सर्वांत मोठा रामनवमीचा उत्सव साजरा करायला आम्हाला शिकवलेलं आहे. चमत्काराच्या आत जाणीवपूर्वक दडवून ठेवलेले साईबाबा आज आम्हाला हवे आहेत. ते साईबाबा नाकारणाऱ्यांचं आणि दाभोलकर-पानसरेंना मारणाऱ्यांचं डोकं सारखंच आहे. गरिबांच्या सेवेत आयुष्य घालवणाऱ्या मदर तेरेसांना मेल्यानंतरही बदनाम करत राहावं, इतकं घाबरणाऱ्यांच्या डोक्याची ठेवणही त्यांच्यापेक्षा फारशी वेगळी नाही.

अशा डोक्यांना ठिकाणावर आणण्यासाठीचा एक फॉर्म्युला मला इतिहासाच्या पानांमध्ये दिसतो. मला वाटतं, आपल्याला तपशीलवार माहीत असलेल्या इतिहासात दोघांनी हा फॉर्म्युला स्वतःच शोधून यशस्वी करून दाखवलाय. ते आहेत शिवाजी आणि गांधीजी. छत्रपती शिवराय आणि महात्मा गांधी हे परस्परविरोधी वाटावेत, इतकी त्यांची प्रतिमा गढूळ करून आपल्याला सांगितलेली आहे. दोघांचा काळ वेगळा आहे, दोघांची शस्त्र वेगळी आहेत; पण थोडं खरवडलं की, या दोघांमधली अनेक साम्यस्थळं दिसतात. मला विचाराल, तर आज भारतीय संस्कृती किंवा 'आयडिया ऑफ इंडिया' टिकून राहिली, ती या दोघांमुळेच. आपल्या काळातल्या आपल्या लढ्यांत या दोघांनाही प्रचंड मोठं यश मिळालेलं आहे. ते त्यांच्या आधी आणि नंतर जवळपास कुणाला मिळालेलं नाही. असं बरंच काही शोधता येईल, शोधायला हवं. पण त्यातल्या दोन गोष्टी इथे अधोरेखित करायच्यात. एक- या दोघांचाही सर्वसामान्य माणसांवरचा आणि सर्वसामान्य माणसांचा या दोघांवरचा गाढ विश्वास. निस्तेज पडलेल्या लोकांवर त्यांनी जणू जादूच केली. साधी माणसं त्यांचे सैनिक बनली. त्या साध्याच माणसांनी इतिहासात अजोड असा त्याग आणि शौर्य यांचं दर्शन घडवलं. दुसरी गोष्ट म्हणजे, सर्वसमावेशकता. या दोघांच्याही विचारसरणीच्या चौकटी पोलादी नाहीत. त्यामुळे त्यांच्यासोबत कुणीही जाऊ शकत होता. जात, धर्म, प्रांत असा कोणताही शिक्का त्यांच्यावर मारता येत नव्हता. त्यांच्याकडे सगळेच होते. सर्वच विचारधारांचे आणि सर्वच प्रकारचे लोक त्यांच्यासोबत गुण्यागोविंदाने राहत होते. तरीही ते सगळे मिळून एका दिशेने जात होते. आज या दोघांसारखा लोकलढा उभारायचा असेल, तर त्यांच्या या दोन गोष्टी मला महत्त्वाच्या वाटतात. त्यांतली इतरही सूत्रं शोधता येतील. शोधायला हवीत.

मला वाटतं, शिवाजी आणि गांधीजी या दोघांनाही आपण लोकांपर्यंत पोहोचवायला हवं- खरे शिवाजी आणि खरे गांधीजी. या दोघांविषयी गैरसमजच फार आहेत, ते तोडायला हवेत. पानसरेंचं 'शिवाजी कोण होता?' हे त्यासाठीचा आपला आदर्श आहे. आपण साहित्यिक असू, तर आपण या दृष्टीने काम करू शकतो. ज्येष्ठ साहित्यिक कार्यकर्ते राजाभाऊ शिरगुप्पे यांनी 'शिवाजी कोण होता?' या विषयावर शंभर भाषणं देण्याचा संकल्प सोडला आहे. गोव्याहून त्याची सुरुवातही झाली आहे. आमचे सोलापूरचे

काही मित्र एकत्र आलेत. त्यांनी याच विषयावर बोलण्यासाठी दहा-बारा वक्ते तयार केलेत. ते पानसरेंचा शिवाजी घेऊन जिल्हा पिंजून काढणार आहेत. मला ही दोनच उदाहरणं माहीत आहेत. असं राज्यभर घडत असेल किंवा घडू शकेल. या सर्व वक्त्यांसाठी आपण शिवाजी महाराजांवर शिबिरं आयोजित करू शकतो का? त्यांच्यासाठी महाराजांविषयी विविध संदर्भ असलेलं हँडबुक तयार करता येईल का? 'शिवाजी कोण होता?' हे छोटं पुस्तक आहे. स्वस्त आहे. पानसरेंना जाऊन आता फक्त महिना झालाय. पुढच्या अकरा महिन्यांत या पुस्तकाच्या एक लाख प्रती विकायच्या, असा विचार आपण करू शकतो का? 'दाभोलकर कोण होते?', 'पानसरे कोण होते?' अशी या दोघांची चांगली चरित्रं लिहायला हवीत. शिवाय लहान मुलांसाठी, कुमारांसाठी सोप्या भाषेत छोटेखानी चरित्रंही हवीत. प्रयत्न केला तर हे दोघे शाळेच्या पुस्तकांतही पोहोचू शकतील. पानसरे गेली काही वर्षं सातत्याने शत्रुमित्रविवेकाविषयी बोलत असत. माओच्या एका सिद्धांताचा संदर्भ देत कार्यकर्त्यांनी आता नेमकं काय करायला हवं, ते सांगत. त्यांच्या समग्र साहित्यातले संदर्भ, माओचा मूळ सिद्धांत, त्यांची भाषणं शोधून काढत या विषयावर एक छोटी पुस्तिका तयार होऊ शकेल कदाचित. ते खूपच मोलाचं होईल. दाभोलकरांच्या खुनानंतर आपण सनातन संस्थेविषयी बरंच बोलतो आहोत. पण सनातन काय आहे, हे सांगणारं नीट डॉक्युमेंटेशन मात्र आपण केलेलं नाही. गांधीजींच्या खुनानंतर तीन-चार दशकांनी त्या कॉन्स्पिरसीवर पुस्तकं यायला सुरुवात झाली. जगन फडणीसांचं 'एका महात्म्याची अखेर', य.दि.फडकेंचं 'नथुरामायण', सदानंद मोरेंचं 'लोकमान्य ते महात्मा', तुषार गांधींचं 'लेट्स किल गांधी' ही त्याची महत्त्वाची उदाहरणं. ही पुस्तकं आपल्या नकळत खूप काम करत आहेत. अशी पुस्तकं दाभोलकर, पानसरेंच्या खुनाविषयी नाही का लिहिली जाऊ शकत? 'हू किल्ड करकरे?' आलं, तसं 'हू किल्ड दाभोलकर?' आणि 'हू किल्ड पानसरे?' का नको?

या विषयाशी थेट संबंध नाही, पण लेखक म्हणून आपल्याला काय करता येईल, यासाठी माझी एक टू डू लिस्ट आहे. ती जाता-जाता सांगतो. त्यातले 'रिंगण' आणि 'प्रबोधनकार डॉट ऑर्ग'सारखे प्रयोग आम्ही मित्र करून पाहत आहोत. पण लिस्ट मोठी आहे. हजारो ख्वाहिशे ऐंसी की हर ख्वाहिश पे दम निकले. हिंदुत्ववाद्यांनी खूप मेहनत घेऊन स्वामी विवेकानंदांना हायजॅक केलंय. त्यांना त्यातून सोडवण्यासाठी वैचारिक लेखनाच्या पातळीवर काही प्रयत्न झालेत. पण ते कादंबरी, नाटक या माध्यमातून अधिक प्रभावीपणे करता येऊ शकेल. भारतीय संस्कृतीला ब्राह्मणी म्हणून बाजूला सारणं खूप सोपं आहे. पण ब्राह्मणी ठरवल्या जाणाऱ्या या संस्कृतीत ब्राह्मणांच्या तुलनेत बहुजनांचं योगदान फारच मोठं आणि महत्त्वाचं आहे. तशी काही इतिहासाची मांडणी होऊ शकते का? ऋषींचं मूळ शोधता येईल का? वयाच्या तिशीत भांबुर्ड्याला रेल्वेखाली जीव देणारे लोकमान्य टिळकांचे सुपुत्र श्रीधरपंत यांच्यावर एखादी कादंबरी किंवा नाटक लिहिलं जाऊ शकतं का? राजारामशास्त्री भागवत, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, प्रबोधनकार ठाकरे, गुरुवर्य कृष्णाजी केळुसकर, धर्मानंद कोसंबी, सत्यशोधक रा.ना.चव्हाण अशा महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेला ललामभूत ठरणाऱ्या पण दुर्लक्षित असलेल्या विचारवंतांची पुस्तकं आज आपल्यासाठी उपलब्ध नाहीत. पण त्यांची ई बुक्स तयार होऊ शकतात. ती करण्यासाठी कुणी पुढे येईल का? आणि हो, साईबाबांची फिलॉसॉफी नेमकी काय आहे, हे चमत्कारांच्या पुढे जाऊन कुणी तरी मांडायला हवंच ना?

मी थोडा इतिहासात रमणारा असल्यामुळे माझ्या लिखाणाच्या कल्पना या अशा आहेत. तुमच्या डोक्यातली पुस्तकं वेगळीच असतील. ती यायला हवीत. त्यासाठी आपण सगळ्यांनी खूप लिहायला हवं. पण जे लिहू, ते आपल्या भाषेत हवं. जे लिहू, ते आपल्या अनुभवांशी प्रामाणिक असायला हवं. त्यामागे नुसती प्रबळ ऊर्मी नको, तर मेहनतही हवी. मजकुराइतकीच त्याची मांडणीही महत्त्वाची आहे, त्यामुळे शैलीवरही आपण काम करायला हवं.

**सचिन परब**, गोवा
Mob.: 09987036805
ssparab@gmail.com

('टेकरेल ॲकॅडमी'च्या वतीने पुणे येथे, १७ व १८ मार्च २०१५ असे दोन दिवसांचे युवा साहित्य संमेलन आयोजित केले होते. 'गोवा दूत' या दैनिकाचे संपादक सचिन परब हे त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणातील हा काही भाग.)

# नास्तिक परिषदेत केलेले भाषण

मित्रहो, नास्तिकांच्या परिषदेत नगरला भाषण करायला येशील का, असं कवी संतोष पवारने विचारलं; तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता मी ‘हो’ म्हणालो. याचं कारण, एक वर्तुळ पूर्ण झाल्याचा आनंद मला उपभोगायचा होता. जवळपास दोन दशकांपूर्वी मी बारावीनंतर नगर सोडून पुण्यात गेलो. अहमदनगर जिल्हा वाचनालय आणि महावीर वाचनालयात मी त्याआधीची तीन-चार वर्षे सरासरी रोज दोन तास वेळ घालवला होता. मुख्यत: वृत्तपत्रांचेच वाचन केले होते आणि तरीही स्वत:ला ‘नास्तिक’ म्हणवून घेण्याइतपत मजल मारली होती... तर पुण्यात गेलो आणि काहीच दिवसांनी वृत्तपत्रात एक छोटेसे निवेदन वाचले- ‘‘मी नास्तिक कसा झालो? या विषयावर निबंध पाठवा. निवडक लेखनाला प्रसिद्धी दिली जाईल. पत्ता- माधव गवाणकर, संपादक, ‘साद’ अनियतकालिक, वडाचा कोड, मु.पो.ता.दापोली, जि.रत्नागिरी.’’ माझ्या अंगात बळ संचारले. निबंध लिहायचा ठरवले. बरेच मुद्दे काढले. संगतवार लावले. आठ-दहा पाने लिहिली. पाठवली. आणि दोन-तीन महिन्यांनंतर दहा-पंधरा पानांचे ते छोटेसे अनियतकालिक आले... साद. त्यात इतर अनेकांप्रमाणेच माझ्याही लेखनातला एक परिच्छेद आला होता. माझ्या नावाने काही तरी छापून येण्याची ती पहिली वेळ. विषय- ‘मी नास्तिक कसा झालो?’

त्यानंतर काही महिन्यांनी मी श्रीविद्या प्रकाशनात गेलो होतो. त्यांच्या सूचीमध्ये एका पुस्तिकेचा उल्लेख दिसला. ‘परमेश्वरावर मात : लेखक- ए.सूर्यनारायण, ए.हरनाथ.’ पुस्तिका घेतली, वाचली. हरखून गेलो. फारच भारी ऐवज हाती आल्याचा आनंद झाला. परत श्रीविद्यामध्ये गेलो. दहा पुस्तिका खरेदी केल्या, दहा मित्रांना भेट दिल्या. ‘तुमच्या मनातील ईश्वरविषयक भूमिका तयार व्हावी, यासाठी उपयुक्त ठरेल यासाठी सप्रेम भेट.’ या आशयाचा सुवाच्च अक्षरातील संदेश आणि लफ्फेदार स्वाक्षरी करून ती पुस्तिका भेट देण्याचा अवर्णनीय आनंद मी उपभोगला. त्या पुस्तिकेच्या समारोपामध्ये असं म्हटलं होतं की, ‘अजूनही तुमचा देवावर विश्वास असेल तर साक्षात परमेश्वरही तुमचे संरक्षण करू शकणार नाही.’ फक्त प्रश्न विचारत जाणारी आणि सुसंगत उत्तर देताच येणार नाही, अशी ती पुस्तिका मी त्यानंतर पंचवीस-तीस मित्रांना भेट दिली. त्या पुस्तिकेचा अनुवाद केला होता वाई (जि.सातारा) येथील डॉ.शरद अभ्यंकर यांनी. त्यांना पत्र पाठवले, ‘तुम्हाला भेटायला आवडेल.’ पुण्यात तुमचा ग्रुप असेल तर सांगा, असेही लिहिले. ‘पुण्यात बुद्धिप्रामाण्यवादी विचारमंच आहे, तिथे जा.’ असे त्यांनी पत्र पाठवून कळवले.

आणखी काही दिवस गेले. वृत्तपत्रांमध्ये एका पुस्तकाचे परीक्षण वाचले. ‘ईश्वर नव्हे, मीच खरा-’ लेखक- नारायण देसाई (गांधीजींचे मानसपुत्र महादेवभाई देसाई यांचे हे चिरंजीव. अलीकडेच त्यांचे निधन झाले.) पुस्तक प्रदर्शनात गेलो, ते पुस्तक मिळवले. आणखी मजा आली. चांगलाच बौद्धिक खुराक होता तो. त्यानंतर काही दिवसांनी शरद बेडेकर यांचे पुस्तक हातात पडले- ‘ईश्वरविरहित जीवन.’ (सध्या या बेडेकरांचा ‘लोकसत्ता’मध्ये कॉलम चालू आहे.) बेडेकरांची आणखी दोन पुस्तके वाचली. अर्थातच, खूप आवडली. त्याच दरम्यान ईश्वराविषयीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संदर्भ असलेले अनेक लेख, वाचत होतो- भाषणे ऐकत होतो आणि स्वत:ला ‘नास्तिक’ म्हणवून घेताना अभिमानच वाटत होता. ईश्वराचे अस्तित्व नसल्याची खात्री पटली होती. त्याबाबतची माझी भूमिका पुढील दोन-तीन वर्षांत इतकी पक्की झाली की, वाईच्याच शरद अभ्यंकरांचा ‘मी नास्तिक का आहे?’ या शीर्षकाचा एक छोटा लेख दै.सकाळच्या संपादकीय पानावर आला आणि पुढील दोन आठवडे बाजूच्या व विरोधातील पत्रांचा पाऊस पडला; तेव्हा ते सर्व वाचून मला असे वाटले की, शरद अभ्यंकरांनी ‘ते नास्तिक का आहेत’ याची फारच वरवरची कारणे दिली आहेत, त्यांनी अधिक खोलात जायला हवे होते. तसे न केल्याने, या लेखातून नास्तिकांची खरी भूमिका पुढे येतच नाही. तशा आशयाचे सविस्तर पत्र ‘सकाळ’कडे पाठवले आणि दुसऱ्याच दिवशी ‘हा वाद आता थांबवत आहोत’ अशी टीप ‘सकाळ’च्या पत्रव्यवहारात वाचली. मग त्या पत्राची झेरॉक्स अभ्यंकरांना

पाठवली. त्यांचे नम्र उत्तर आले, 'तू म्हणतोयस ते खरेही असेल, पण जागेची मर्यादा लक्षात घेता मला तेवढेच लिहिता आले, वगैरे...' त्यानंतर 'मी नास्तिक का आहे?' ही भगतसिंगांची पुस्तिका वाचली. त्या पुस्तिकेबाबतही मला अपूर्णत्वच जाणवले. पण असेही वाटले की, भगतसिंग २३ व्या वर्षी गेले आणि १९३० च्या आधी ती पुस्तिका लिहिलेली असल्याने ते अपूर्णत्व साहजिक आहे.

नंतरच्या टप्प्यावर श्याम मानव यांची दोन-तीन भाषणे ऐकली आणि 'बुवाबाजी बळी स्त्रियांचा' हे पुस्तक वाचले. त्यानंतर डॉ.नरेंद्र दाभोलकरांची एक-दोन भाषणे आणि दोन-तीन पुस्तके. मला वाटते, ईश्वरविषयक विचार करण्याचा माझा दुसरा टप्पा इथून सुरू झाला असावा. साधारणतः इ.स.२००० हे वर्ष. पहिल्या टप्प्यात मी ईश्वराचे अस्तित्व नसल्याची माझी भूमिका घासून, पुसून, तासून घेत होतो. दुसऱ्या टप्प्यात मात्र, ईश्वरविषयक संकल्पनेमुळे समाजजीवनात काय व किती अनिष्ट घडत आले आहे आणि ते कसे रोखता येईल याचा विचार करू लागलो. त्यामुळे एका बाजूला सामाजिक बदलांच्या संदर्भात वाचन आणि विचार करू लागलो, तर दुसऱ्या बाजूला विज्ञानविषयक वाचन करीत मानवी उत्क्रांती कशी होत गेली हे समजून घेत गेलो. (या दोनही प्रकारांतील वाचन किती व्हरायटीचे होते, हा खूप मोठा व स्वतंत्र विषय आहे.) सामाजिक परिवर्तन व विज्ञानाची वाटचाल अशा दोन्ही अंगांनी विचारप्रक्रिया चालू राहिली आणि मग हळूहळू नास्तिकता व बुद्धिप्रामाण्यवाद यापेक्षा 'विवेकवाद' हा शब्द जवळचा वाटायला लागला. त्याचदरम्यान डॉ.लागू व डॉ.दाभोलकर यांचा 'वाद-संवाद : विवेक जागराचा' हा कार्यक्रम दोन-तीन वेळा ऐकला, पाहिला. दोन-अडीच तासांचा तो कार्यक्रम म्हणजे मनात लाटा-लहरी उत्पन्न करणारी मस्त वैचारिक मेजवानी होती. ''परमेश्वर हीच सर्वांत मोठी व पायाभूत अंधश्रद्धा आहे आणि तिच्यावर प्रहार केल्याशिवाय अन्य अंधश्रद्धा दूर होणार नाहीत,'' हा डॉ.लागू यांच्या मांडणीचा गाभा होता. याउलट, ''ईश्वर या संकल्पनेला विरोध न करता, शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार व प्रसार करणे, कालसुसंगत धर्मचिकित्सेचा आग्रह धरणे आणि व्यापक परिवर्तनाच्या चळवळीला जोडून घेणे'' ही चतुःसूत्री डॉ.दाभोलकरांच्या म्हणजे अंनिसच्या भूमिकेचा गाभा होती. तो वाद-संवाद ऐकून माझे असेच मत झाले की, ज्ञात अवकाशात ईश्वराचे अस्तित्व नाही, याबद्दल या दोनही डॉक्टरांचे एकमत आहे. फरक असेल तर एवढाच आहे की, ''ईश्वर नाही असे सांगून कामाला लागा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करा,'' असे डॉ.लागू यांना म्हणायचे आहे. तर ''अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करायला लागा आणि मग आपोआपच ती व्यक्ती 'ईश्वर नाही' या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचेल, आणि समजा नाही पोहोचली तरी काही बिघडत नाही. दरम्यानच्या प्रवासात त्या व्यक्तीने जे काही टप्पे ओलांडलेले असतील, त्यांतूनही त्या व्यक्तीचे व समाजाचे भलेच होणार आहे; तेवढ्यावर समाधान माना... आपण ज्या कार्यक्षेत्रात आहोत, तेथे कामाचा विचार दशकांच्या नव्हे तर शतकांच्या कालावधीत करावयास हवा याची जाणीव ठेवा'' अशी डॉ.दाभोलकर व अंनिस यांची भूमिका होती आणि त्याप्रमाणेच त्यांनी पावशतक काम केले आहे.

आज नास्तिकांची परिषद भरली आहे. आणि तुम्हा सर्वांना असेच वाटत असणार की, डॉ.लागूंच्या म्हणण्याप्रमाणे चालून पाहावे. तुमच्यापैकी काहींनी डॉ.दाभोलकरांच्या व अंनिसच्या बरोबर काम केले आहे, अद्याप करत आहात. तरीही असा काही वेगळा प्रवास करावा वाटत असेल; तर याचा अर्थ तुम्हाला परिवर्तन आणि परिणाम अधिक गतीने-वेगाने व्हायला हवे आहेत, असे मी मानतो. तुम्हाला हा प्रवास कोणत्या पद्धतीने करायचा आहे, त्याची काही त्रिसूत्री- चतुःसूत्री-पंचसूत्री तुम्ही तयार केली आहे का, हे मला माहीत नाही. पण तसा प्रवास करायचे तुमच्या मनात असेल, तर त्याला शुभेच्छा देत असतानाच, त्या संदर्भातील आकलन मांडणे हे माझे कर्तव्य समजतो. माझे आकलन असे सांगते की, नास्तिकांना सार्वजनिक काम करायचे असेल, तर तीन प्रमुख आघाड्यांवरील अडथळ्यांचा सामना करावा लागेल. वैज्ञानिक, तात्त्विक आणि व्यावहारिक.

१. आज जे कोणी लोक निरीश्वरवादाची मांडणी करतात, त्यांचा प्रमुख मूलाधार आहे विज्ञान. म्हणजे, या पृथ्वी नावाच्या ग्रहावरच जीवसृष्टी आहे आणि या ग्रहावरील कोपरा-न्-कोपरा ज्ञात आहे, छाननी झाली आहे. त्यातून हे सिद्ध झाले आहे की, अशी कोणतीही दैवी शक्ती नाही, जी या ग्रहगोलाचे किंवा मानवी जीवनाचे, सजीव सृष्टीचे नियंत्रण करते. याबाबत सर्वत्र शोध घेऊन 'असे काहीही अस्तित्वात नाही,' हे विज्ञान सांगते. चंद्रावर माणूस उतरला आणि तिथेही ईश्वराचे अस्तित्व नाही, असे विज्ञानातून सिद्ध झाले आहे. आकाशगंगा, तिच्यातील ग्रह, उपग्रह, तारे आणि आकाशगंगेच्या बाहेरचा अफाट पसारा याबाबत मात्र आपल्याला जुजबी माहितीच विज्ञान देऊ

शकले आहे. विज्ञानाने साध्य केलेली प्रगती अफाट आहे, जे शोधले आहे ते खूपच जास्त आहे, पण विज्ञानाला अज्ञात असा प्रदेश या विश्वाच्या पसाऱ्यात कितीतरी जास्त आहे. हा पसारा नेमका किती आहे, याबाबतही विज्ञान अद्याप सांगू शकलेले नाही आणि या विश्वाची निर्मिती कशी झाली असावी, याबाबत तीन-चार सिद्धांत मांडले जात आहेत; पण कशावरही अद्याप एकमत नाही. विश्वाची निर्मिती झाली त्याआधी काय होते, याबाबतही विज्ञान काही सांगत नाही. आधुनिक विज्ञानाने ५०० वर्षांच्या इतिहासात कित्येक गूढ रहस्ये उलगडून दाखवली असली तरी अद्याप त्याच्या कित्येक पट रहस्ये उकलणे बाकी आहे. सारांश- उपलब्ध पुरावे व ज्ञात माहिती लक्षात घेता, ईश्वराचे अस्तित्व नाही, असे विज्ञान ठामपणे सांगते. पण अज्ञात प्रदेशात काही असले तर? या प्रश्नाला विज्ञानाचे उत्तर 'नाही' असे नाही. ते उत्तर, ''असूही शकेल कदाचित, पण शोधल्याशिवाय 'हो' किंवा 'नाही' कसे सांगणार?'' असा प्रतिप्रश्न विचारणारे आहे.

मित्रहो, विज्ञान हे ठाम असते, निश्चित व निर्णयात्मक उत्तर देते; ते उत्तर स्थल, काल किंवा व्यक्ति-सापेक्ष नसते. पण विज्ञान नम्रही असते. निरीक्षणे, प्रयोग, तर्क, अनुमान या साखळीपद्धतीने विज्ञान पुढे सरकते. नवे पुरावे व नवी निरीक्षणे पुढे आली आणि नवे प्रयोग व नव्याने तर्क लावला तर नवे निष्कर्ष पुढे येतात, आधीचे रद्दबातल होतात. त्यामुळे ठामपणा व नम्रपणा यांचे अजब मिश्रण विज्ञानाच्या प्रक्रियेत आणि वैज्ञानिक दृष्टिकोनात असते. म्हणून ईश्वराच्या अस्तित्वाविषयी विज्ञानाची भूमिका अज्ञेयवादी आहे. म्हणजे विज्ञानाच्या साह्याने विश्वाच्या अफाट पसाऱ्याचे आकलन करून घेणारी कोणीही व्यक्ती स्वत:ला निरीश्वरवादी म्हणवून घेण्यापेक्षा अज्ञेयवादी म्हणवून घेणे पसंत करील. म्हणजे स्वत:ला नास्तिक किंवा निरीश्वरवादी म्हणवून घेणाऱ्याला 'अज्ञात प्रदेशातही ईश्वर नाही' असे ठामपणे म्हणावे लागेल; पण ते कशाच्या आधारावर म्हणणार? त्या विधानाला विज्ञान आधार देऊ शकत नाही.

२. दुसरा अडथळा आहे तत्त्वज्ञानाचा. तत्त्वज्ञानाच्या बऱ्याच शाखा आहेत आणि त्यासंदर्भात बोलताना- लिहिताना Metaphysics, Philosophy, Ethics आणि Morality इत्यादी संकल्पना आपल्या मनात येतात. यात भारतीय आणि पाश्चात्त्य तत्त्ववेत्ते यांचा एकत्र विचार केला तर ही गुंतागुंत इतकी प्रचंड आहे की, निसर्गविज्ञानालाही ती लाजवेल. भारतातील वेद-उपनिषदे किंवा महर्षी कणाद आणि पश्चिमेकडील सॉक्रेटिस, ग्रीक फिलॉसाफी इथपर्यंत जायचे ठरवले; तर पाच हजार वर्षांपर्यंत मागे जावे लागेल. तत्त्वज्ञानाची गंभीर वा जड पुस्तके तर सोडाच, पण विंदा करंदीकरांची 'अष्टदर्शने' वाचली किंवा विल ड्युरांटचे 'स्टोरी ऑफ फिलॉसॉफी' (मराठी अनुवाद : पाश्चात्त्य तत्वज्ञानाची कहाणी- साने गुरुजी) वाचले, तरी मती गुंग होऊन जाईल. युगानुयुगे ईश्वराचा चाललेला शोध, या तत्त्वज्ञानाच्या वाचनातून/अभ्यासातून अधिकाधिक कठीण होत चालल्याचे लक्षात येईल. म्हणजे तत्त्वज्ञानाच्या प्रांतात जितके खोल जावे तितका ईश्वराचा शोध दूरदूरचा वाटत राहतो. मात्र तरीही 'ईश्वर नाहीच,' यावर तत्त्वज्ञानाच्या विविध प्रवाहांचे एकमत होत नाही.

यात विशेष महत्त्वाचा भाग येतो तो धर्माच्या संदर्भात. ख्रिश्चन व इस्लाम हे एकेश्वरी धर्म एक धर्मग्रंथ मानणारे आहेत. हिंदू धर्माला असे ईश्वरांच्या व ग्रंथांच्या संख्येचे बंधन नाही. जैन व बौद्ध हे निरीश्वरवादाच्या जवळ जातात, पण कोणत्या ना कोणत्या प्रकारची अवतार कल्पना तिथे मानली आहे. शिवाय, पूर्वजन्म व पुनर्जन्म या संकल्पनाही त्यांच्यातील काही प्रवाहांमध्ये आहेत. म्हणजे सर्व धर्मांचे ईश्वरविषयक संकल्पनेवर एकमत नाही, हा मुद्दा निरीश्वरवादाला बळकटी देणारा आहे. पण सर्वच धर्मांचे अनुयायी 'ईश्वर हा अनुभवाचा प्रांत आहे, तर्काचा नव्हे' असे सांगतात. किंबहुना, धर्मश्रद्धेची चर्चा चालू असते तेव्हा पहिला बळी दिला जातो तो तर्काचाच. तर्क लावणे म्हणजे संशयी वृत्ती बाळगणे; हा श्रद्धेच्या मार्गातील प्रमुख अडथळा मानला जातो. त्यामुळे धर्मश्रद्धा किंवा धार्मिक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात चर्चा/चिकित्सा करायला निरीश्वरवाद्यांना वा नास्तिकांना मान्यताच दिली जात नाही. धर्मपरंपरा नाकारून, ऐहिक जीवनात इष्ट-अनिष्ट ठरवण्याचा आग्रह धरणाऱ्या गोपाळराव आगरकरांनीही क्रांतिकारी मांडणी करत असताना स्वत:ला अज्ञेयवादी म्हणवून घेणेच पसंत केले होते. (तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र व इतिहास यांचा त्यांनी चांगलाच अभ्यास केला होता, असे त्यांच्या लेखनावरूनही दिसतेच!) त्यामुळे, नास्तिकांना स्वत:चे असे तत्त्वज्ञान मांडावे लागेल- 'ईश्वर अस्तित्वात नाही' या म्हणण्याचे. पण तसे कशाच्या आधारावर म्हणता येणार आहे? तत्त्वज्ञानाच्या व तर्काच्या पद्धतीने विचार केला, तर कोणत्याही धर्मातील ईश्वराचे किंवा कोणत्याही प्रकारच्या ईश्वरी सत्तेचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही, हे खरे! पण तर्काच्या आधारावर 'ईश्वर नाहीच' असे सिद्ध करता येत नाही, हेही तितकेच खरे!

३. नास्तिकांना जास्त कठीण आव्हान आहे, ते व्यावहारिक पातळीवर. नरहर कुरुंदकर यांनी 'मी आस्तिक का नाही?' या लेखात असे विधान केले आहे की, शेकडा ९८ माणसे त्यांना देवाविषयी नेमके काय वाटते ते खरे सांगत नाहीत किंवा सांगू शकत नाहीत. त्या विधानाचा नेमका अर्थ असा आहे की, जगात नास्तिक एक टक्का असतात, तसेच प्रामाणिक व अभ्यासपूर्वक मत बनवलेले खरे आस्तिक एक टक्काच असतात. उरलेल्या ९८ टक्क्यांनी आस्तिक-नास्तिक यांच्या सीमारेषेवर गर्दी केलेली असते. त्यामुळे, मित्रहो एक टक्का नास्तिकांना एक टक्का अस्तिकांशी संघर्ष करायचा आहे की, सीमारेषेवरील ९८ टक्क्यांशी? या ९८ टक्क्यांनी ईश्वराविषयी सखोल अभ्यास, विचार केलेला नसतो. उपलब्ध वेळेत व श्रमात त्यांना ते शक्यही नसते आणि त्यांना त्याची गरजही वाटत नाही. पाठीमागून चालत आलेल्या प्रथा-परंपरा ते पुढे घेऊन जात असतात. त्या रूढी-परंपरामध्ये मोठ्या विसंगती आहेत, ढोबळ विरोधाभास आहेत असे उघड दिसत असले; तरी ते पुढे चालवले जाते. त्यामुळे 'ईश्वर नाही' असे सांगून या ९८ टक्क्यांशी लढायचे म्हणजे त्यांच्या अर्ध्या-कच्च्या धर्मभावनेशीच खेळायचे, असा अर्थ निघतो. आणि तुम्ही देवा-धर्माच्या विरोधात खेळताय म्हटले की; हा ९८ टक्के वर्ग पुढचे काही ऐकून किंवा समजून घेण्याच्या मन:स्थितीतच नसणार, तेवढी त्यांची क्षमताही नसणार आणि त्यांच्याकडे तेवढी उसंतही नसणार. त्यांतले थोडे समजदार एवढेच म्हणतील की, 'नसेलही कदाचित परमेश्वर; पण ईश्वर ही आंधळ्याच्या हातातली काठी आहे, ती तुम्ही कशाला काढून घेताय?' डॉ.दाभोलकर आणि अंनिस यांची भूमिका 'आम्ही त्याचे अंधत्व काढण्याचा प्रयत्न करतोय, मग त्याला काठीची गरजच राहणार नाही' अशी होती. अंधत्व काढून घेणे ही महाकठीण गोष्ट आहे; त्यामुळे आंधळ्याच्या हातातील काठीबद्दल बोलणेच नको, अशी ती व्यावहारिक भूमिका होती, आहे!

नास्तिकांची या संदर्भातील भूमिका उलटी असू शकते. म्हणजे ईश्वर ही मूलभूत/पायाभूत अंधश्रद्धा दूर झाली तर पूर्वजन्म-पुनर्जन्म आणि पाप-पुण्याच्या कल्पना संपुष्टात येतील. मग जादूटोणा-भूत-भानामती, अतिंद्रिय शक्ती, विविध प्रकारचे ज्योतिष आणि या सर्वांतून उगम पावणाऱ्या विविध प्रकारच्या अंधश्रद्धा निर्माणच होणार नाहीत. पण व्यावहारिक प्रश्न हा आहे की, या विविध प्रकारच्या अंधश्रद्धांचे जोखड काढल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या मनात निरीश्वरवादाची संकल्पना कशी घुसवता येईल?

मित्रहो, वरील तीन प्रमुख अडथळ्यांच्यानंतर तीन छोटे पण महत्त्वाचे अडथळे सांगतो आणि थांबतो-

१. घरातील व भोवतालच्या वातावरणातून झालेल्या संस्कारांच्या बळावर नास्तिक झालेली व्यक्ती आणि विचार-अभ्यास याद्वारे नास्तिक झालेली व्यक्ती यांच्यात दिसायला छोटा, पण प्रत्यक्षात खूप जास्त फरक असतो. केवळ संस्कारांच्या बळावर नास्तिक झालेली व्यक्ती कठीण प्रसंग आला तर दैवशरण होऊन शकते, व्यक्तिगत अनुभवावरून सामाजिक सिद्धांत मांडण्याची सवय तिला लागू शकते, अहंकारी वृत्तीची वाढ तिच्यात होऊ शकते आणि भावनांचे महत्त्व कमी लेखून कोरड्या जीवन-व्यवहाराचा पुरस्कार करू शकते. हे समाजस्वास्थ्यासाठी धोकादायक असते.

२. भारताच्या राज्यघटनेची प्रास्ताविका नजरेखालून घातली तरी लक्षात येईल, ही राज्यघटना ईश्वरी सत्तेविषयी एकही शब्द बोलत नाही, धर्म ही व्यक्तिगत बाब आहे असे मानते आणि वैज्ञानिक दृष्टिकोन (सायंटिफिक टेंपरामेंट) समाजमनात रूजविणे हा कर्तव्याचा भाग आहे, असे स्पष्टपणे सांगते. त्यामुळे नास्तिकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, भारतीय राज्यघटना आपल्याला खूपच अनुकूल आहे हे खरे; पण देव, धर्म व उपासना याबाबतच्या व्यक्तिस्वातंत्र्याला पुरेपूर संरक्षण ती देते.

३. बराक ओबामा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होण्यासाठी पहिल्यांदा उमेदवार होते तेव्हा प्रचारसभांमधून त्यांनी फार सर्वसमावेशक भाषणे केली. तेव्हा भाषणाची सुरुवात करताना ते उपस्थित ख्रिश्चन, मुस्लिम, ज्यू, हिंदू यांना संबोधित असतानाच 'अथेइस्ट' किंवा 'नॉनबिलिव्हर्स' (निरीश्वरवादी, निधर्मी, नास्तिक) असे संबोधनही वापरत असत. तेव्हा जगभरातील नॉनबिलिव्हर्स व अथेइस्ट लोकांनी 'आपली दखल घेतली जात आहे' म्हणून आनंद व्यक्त केला होता. पण नंतर त्यांच्या लक्षात आले की, आपल्याला इतर धर्म किवा पंथ यांच्यासोबत संबोधले जात आहे, म्हणजे नास्तिकांचा धर्म किंवा पंथ आहे असा तर अर्थ घेतला जात नाही ना?

**विनोद शिरसाठ**
vinod.shirsath@gmail.com
Mob.: 9850257724

(२२ मार्च २०१५ रोजी, सरदार भगतसिंग यांच्या स्मृतिनिमित्त अहमदनगर शहरात झालेल्या नास्तिक परिषदेत केलेले समारोपाचे भाषण.)

## सुजीत : माझा मित्र

मी विट्यात राहतो. विटा हे तालुक्याचे गाव आहे. पन्नास हजारांच्या वर इथली लोकसंख्या आहे. इथे माझे घर आहे. माझ्या घरापासून थोड्या अंतरावर सुजीत राहायचा. त्याच्या वडिलांनी बांधलेला एक सुंदर बंगला आहे. वडील डॉक्टर आहेत. सुजीत दुसरीत शिकत असताना त्याचे कुटुंब त्या बंगल्यात राहायला आले. सुजीतची आईही डॉक्टर आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर त्यांचे हॉस्पिटल आहे.

सुजीतच्या आईने एक दिवस माझ्या सौ.ला सुजीतच्या शिकवणीबद्दल विचारले. माझी सौ.ही शिक्षिका आहे. सौ.ने सांगितले, 'सुजीतला अभ्यासाला पाठवा. शिकवणी नाही, पण मी त्याचा अभ्यास घेईन.' एक दिवस सुजीतची डॉक्टर आई सुजीतला घेऊन आमच्या घरी आली.

सुजीत एवढा गोड-गोंडस, बोलायला गोड मुलगा होता की, तो आल्यापासून माझ्या घरातील सर्वांचाच छोटा मित्र बनला.

माझी मुले आता मोठी झाली होती. घरात लहान मूल कोणी नव्हते. त्यामुळे या छोट्या दोस्ताचे आम्हाला खूप कौतुक वाटायचे.

शहरातील एका महागड्या शाळेत त्याचे नाव घातले होते. दररोज सायंकाळी सहा वाजता तो आमच्या घरी यायचा. तोपर्यंत आम्ही शाळेतून घरी आलेलो असायचो. तो सरळ स्वयंपाकघरात मॅडमजवळ जायचा. मॅडम त्याचे वाचन घ्यायच्या, गणिते सोडवून घ्यायच्या. पाढे म्हणवून घ्यायच्या. तोही मनापासून अभ्यास करायचा. रात्री आठ वाजता त्याची आई त्याला न्यायला यायची. अगदी अनिच्छेनेच तो घरी जायचा.

सुजीतच्या वडिलांच्या हॉस्पिटलची प्रॅक्टिस खूप जोरात चालायची. रात्री नऊ वाजेपर्यंत त्यांचे पेशन्ट संपायचे नाहीत. आई मात्र हॉस्पिटलमधून लवकर घरी यायची. घरी आली की, सुजीतला आमच्या घरी पाठवायची आणि रात्री न्यायला यायची.

सुजीतचा आम्हाला आणि आमच्या सर्व घराचा सुजीतला एवढा लळा लागला की, रविवारी त्याचे आई-वडील सुजीतसह कुठे तरी सहलीला जायचे तेव्हा आम्हाला सुजीत आज आलेला नाही याची तीव्रतेने जाणीव व्हायची. दुसऱ्या दिवशी सुजीत धावतच आमच्या घरी यायचा आणि काल सुट्टीत काय काय धमाल केली, हे सांगायचा.

> दुसऱ्या दिवसापासून सुजीत आमच्या घरी यायचा बंद झाला. गेली आठ-साडेआठ वर्षे तो न चुकता दररोजचे दोन तास आमच्या घरी येऊन अभ्यास करीत होता. कोणत्याही स्वार्थी भावनेचा लवलेश न दाखवता आम्ही त्याला अभ्यासात मदत करीत होतो. खरे तर त्याचा स्वभाव एवढा लाघवी आणि गोड होता की, आम्हाला तो कधी परका वाटलाच नाही. पण सुजीत आमच्या घरी यायचा बंद झाला, हे माझ्या मनाला खूप लागले. मॅडमनी तर मलाच सारा दोष दिला.

सुजीत तिसरीत गेला, तेव्हा त्याच्या आईला दुसरे बाळ झाले. सुजीत दररोज अभ्यासाला आला की, बाळाच्या खूप गमती-जमती सांगायचा. तो छोटा मित्र खूप बोलका होता. आम्हालाही तो बोलके करायचा. आम्ही कोणी परके शेजारी आहोत, असे त्याला वाटायचेच नाही. कधी कधी मॅडमकडे तो डब्यातील खाऊसाठी आग्रह धरायचा. खाऊ कमी दिला तर 'मला एवढाच का?' म्हणून तो रुसूनही बसायचा. मग मॅडमना त्याला समजावावे लागायचे.

सुजीतचे वडील नावाजलेले डॉक्टर होते. पेशन्ट्सची भरपूर गर्दी त्यांच्याकडे असायची, पण व्हिमजिकल किंवा अतिशहाणा डॉक्टर म्हणून ते गावात प्रसिद्ध होते. कोणत्याही व्यक्तीबरोबर झालेली त्यांची दोस्ती फार काळ टिकायची नाही. हे डॉक्टर केव्हा कसे वागतील, हे सांगताच यायचे नाही. त्याला कारणही तसेच होते. डॉक्टरांचे बालपण सामान्य परिस्थितीत गेले होते.

बालपणापासून ते अत्यंत हुशार असल्यामुळेच डॉक्टर होऊ शकले होते; पण डॉक्टर होताना परिस्थितीने अनेक मानापमानाचे अणि घरच्या अठराविश्वे दारिद्र्याचे चटके त्यांना सोसावे लागले होते. पै-पाहुण्यांचा आणि श्रीमंत नातेवाइकांचा मोठा अनुभव त्यांच्याजवळ होता. त्यामुळे ते स्वभावाने जरा तिरसटच बनले होते.

सुजीत तिसरीत असतानाच त्याच्या शिक्षकांनी त्याला चौथीच्या स्कॉलरशिपचा अभ्यास करायला लावले. तो स्कॉलरशिपच्या अभ्यासातील शंका मॅडमना दररोज विचारायचा. त्या कधी कधी मलाही सोडवाव्या लागायच्या. त्याचे वैशिष्ट्य असे होते की, तो दररोज न चुकता सहा ते आठ या वेळात आमच्या घरी यायचाच आणि घरातील काम व स्वयंपाक करता-करता मॅडम त्याचा अभ्यास करवून घ्यायच्या. याचा योग्य तो परिणाम झाला आणि सुजीत स्कॉलरशिपच्या परीक्षेत महाराष्ट्रात पहिल्या दहा नंबरांत आला. त्याचे, त्याच्या शाळेचे भरपूर कौतुक झाले.

निकाल समजल्या-समजल्या सुजीत धावतच आमच्या घरी आला. आम्हां दोघांच्या पाया पडला आणि मनापासून म्हणाला, ‘तुम्ही दोघांनी अभ्यास घेतलात, म्हणूनच मला हे यश मिळाले.’

तो खूप चांगली चित्रे काढायचा. सकाळ वृत्तपत्रातर्फे चित्रकलेची स्पर्धा प्रतिवर्षी होते. त्या स्पर्धेत सलग चार-पाच वर्षे त्याला बक्षिसे मिळाली.

सातवीच्या स्कॉलरशिप परीक्षेलाही तो चांगलाच चमकला. नंबरात आला. सायंकाळी सहा वाजले रे वाजले की, तो आमच्या घरी अभ्यासासाठी हजर झालाच. मॅडमनी त्याच्याकरता एक वेळापत्रक करून ठेवलेले होते. सोमवार ते शनिवार सहा दिवस ते मराठी, हिंदी, गणित, इंग्रजी, इतिहास, भूगोल, विज्ञान या विषयांचा अभ्यास करीत. एक तास मागील उजळणी आणि एक तास पुढील वाचन वगैरे नियमित चालायचेच. त्याचा खूप फायदा बुद्धिमान सुजीतला होत होता.

तो दहावीत होता. मधेच आषाढी एकादशी किंवा गोकुळाष्टमी अशी सुट्टी होती. सुजीत सकाळीच घरी आला. इकडचे-तिकडचे बोलत राहिला. सुट्टी असल्यामुळे आम्ही सर्व-जण घरीच होतो. सुजीतने आमच्याबरोबरच दुपारचा फराळ केला आणि म्हणाला, ‘गुरुजी, मॅडम, मला या तुमच्या घरातून आमच्या घरी जाऊच वाटत नाही. आमच्या घराऐवजी परमेश्वराने मला तुमच्या घरात जन्माला घातले असते, तर किती चांगले झाले असते!’

आमच्या लक्षात आले की, तो खूप नाराज आहे. आम्ही म्हटले, ‘सुजीत असे का बोलतोस रे?’

‘आमचे पप्पा आणि मम्मी एकमेकांशी एवढे भांडत असतात की, काही विचारू नका. रोज रोज पप्पांची आणि मम्मीची धुसफूस घरात सुरू असते. मम्मीची कोणतीच गोष्ट पप्पांना आवडत नाही आणि पप्पांनी दाखविलेली नापसंती मम्मी सहन करीत नाही.’

डॉक्टरांच्या स्वभावामुळे त्यांचे व त्यांच्या पत्नीचे पटत नाही, हे ऐकिवात होते. पण त्याचा परिणाम आता कळतेपण येऊ लागलेल्या मुलांवर होऊ लागला होता... हे जरा गंभीरच होते. पण याबाबत आम्ही कोणीही काहीही करू शकत नव्हतो. कारण डॉक्टरांच्या स्वभावाला औषध नव्हते व डॉक्टरांचा तिरका आणि चिडका स्वभाव सुजीतच्या मम्मीने तरी कुठवर सोसायचा? त्यामुळे त्यांच्याही स्वभावात फरक पडू लागला होता.

‘सुजीत, तू अभ्यास कर! खूप हुशार आहेस तू. तुझ्या हुशारीचा तुला फायदा होईल. तुझे चांगले करिअर तू स्वत:च घडवशील. मम्मी-पप्पांकडे जरा दुर्लक्ष कर’ वगैरे वगैरे मी त्याला समजावले आणि घरी पाठवले.

या प्रसंगाबाबत डॉक्टरांना किंवा डॉक्टरबाईंना काहीही बोलायचे नाही, असे आम्ही दोघांनीही घरात ठरवून टाकले होते. तसेच सुजीतजवळही हा त्यांच्या घरातला विषय काढायचा नाही, असेही आम्ही ठरवून टाकलेले होते. सुजीत अभ्यासासाठी नियमित येत होता. रोजचा अभ्यास करीत होता, पण नियतीला हे मंजूर नसावे.

एका लग्नसमारंभानंतर दिलेले स्नेहभोजन होते. त्या कार्यक्रमासाठी मला आमंत्रण होते. मी त्या कार्यक्रमासाठी उपस्थित होतो. लोक जेवण घेऊन एकेक टेबल गाठून त्यावरती ताट ठेवून जेवत होते. मीही ताट घेतले आणि एक टेबल गाठले. आपले ताट घेऊन सुजीतचे वडील आले आणि माझ्या शेजारच्या रिकाम्या खुर्चीवर बसले.

जेवता-जेवता म्हणाले, ‘गुरुजी, काय म्हणतोय आमचा सुजीत? त्याला मात्र तुमच्या घराचा फारच लळा लागलाय हो! सारख्या मॅडमच्या, तुमच्या घरातील आठवणी सांगत असतो.’

‘तुमचा सुजीत हुशार आणि मनाने स्वच्छ, शांत मुलगा आहे. फक्त तुम्हाला मी आठवणीने एक गोष्ट सांगू इच्छितो की, मुले या वयात फार भावनाप्रधान बनलेली असतात, तेव्हा त्यांच्यासमोर तुम्ही पती-पत्नींनी आपले भांडण न

केले तर बरे होईल.' मी असे पट्कन बोलून गेलो.

डॉक्टरांनी डोळे मोठे करीत माझ्याकडे पाहिले. बोलले काहीच नाहीत. खाली बघून ते जेवू लागले. मीही माझे जेवण संपवून उठून आलो.

त्याच्या दुसऱ्या दिवसापासून सुजीत आमच्या घरी यायचा बंद झाला. गेली आठ-साडेआठ वर्षे तो न चुकता दररोजचे दोन तास आमच्या घरी येऊन अभ्यास करीत होता. कोणत्याही स्वार्थी भावनेचा लवलेश न दाखवता आम्ही त्याला अभ्यासात मदत करीत होतो. खरे तर त्याचा स्वभाव एवढा लाघवी आणि गोड होता की, आम्हाला तो कधी परका वाटलाच नाही. पण सुजीत आमच्या घरी यायचा बंद झाला, हे माझ्या मनाला खूप लागले. मॅडमनी तर मलाच सारा दोष दिला.

एका शनिवारी आम्ही सकाळची शाळा करून दुपारी घरी परतलो. अगदी थोड्या वेळात सुजीत आम्हाला भेटायला आला. तो म्हणाला- त्याच्या पप्पांनी त्याला आमच्या घरी पाऊल टाकायचे नाही, टाकशील तर या घरात राहायचे नाही, या शब्दांत ताकीद दिलेली आहे. तुमच्या घरात माझा अभ्यास होत होता. मॅडम मला मार्गदर्शन करीत होत्या. पण पप्पांची समजूत झाली आहे की, तुम्ही मला खोदून-खोदून आमच्या घरच्या बातम्या विचारून घेता आणि त्या गावभर पसरवता.

'मी पप्पांना सांगितले, मी गुरुजींच्या आणि मॅडमच्या घरी जात नाही, पण तुम्हीही माझ्यासाठी एक गोष्ट केली पाहिजे. ती गोष्ट म्हणजे काहीही आणि कोणतेही कारण घडले तर तुम्ही आणि मम्मीने अजिबात भांडायचे नाही. पप्पांनी आणि मम्मीने दोघांनीही ते कबूल केले आहे. गेल्या आठ-दहा दिवसांत ते एकमेकांशी भांडले नाहीत. पण तुमचे घर माझ्यासाठी कायमचे बंद झाले याचे वाईट वाटते.'

'तुझे आई-वडील हेच तुझे खरे मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि सर्व काही आहेत. तू आमच्यावर माया केलीस, आम्हीही तुझ्यावर माया केली. तू मोठा हो. स्वत: अभ्यास कर, स्वत: शिक्षणाची उभारी घे. त्यातच आमचा आनंद सामावलेला आहे. आमच्या शुभेच्छा सतत तुझ्या पाठीशी आहेत.' आम्ही त्याला धीर देत सांगितले.

पुढे सुजीत आमच्या घरी यायचा बंद झाला. कुठे रस्त्यात भेटला तर मस्त हसायचा. एखादा शब्द बोलायचा. तो ८६ टक्के मार्क्स मिळवून दहावी उत्तीर्ण झाला. त्या वेळी घरी येऊन पेढे देऊन गेला.

अकरावी सायन्सला त्याने ॲडमिशन घेतली. त्याची मनापासून अभ्यास करायची सवय होती. त्यामुळे तो चिकाटीने अभ्यास करू लागला. आम्हीही आमची मुले, त्यांच्या नोकऱ्या, आमच्या



नोकऱ्या यात गुंततच चाललो होतो. सुजीतचा आम्हाला विसरही पडत चालला होता. भेटला तर 'हाय! हॅलो!' होत होते. तोही छान हसून जात होता.

तो बारावी पास झाला. त्याला ८८ टक्के मार्क्स मिळाले. घरी येऊन पेढे देऊन आशीर्वाद घेऊन गेला. त्याचा त्या वेळचा उत्साह आणि आनंद गगनात मावत नव्हता. शब्दाशब्दांतून तो आनंद व्यक्त होत होता.

निकालानंतरच्या पुढच्या आठवड्यात रस्त्यावरच्या वळणावर त्याची भेट झाली. त्याने

थांबायची मला खूण केली. मी स्कूटरवरून थांबलो. तो माझ्याजवळ आला आणि म्हणाला, ‘गुरुजी, तुम्हाला भेटायची फार इच्छा होती. बरे झाले, आपली गाठ पडली. पप्पांची इच्छा आहे मी मेडिकल कॉलेजसाठी अर्ज भरावा. पण मेडिकल फील्ड मला अजिबात आवडत नाही. मला इंजिनिअर व्हायचे आहे, तेही मेकॅनिकल इंजिनिअर. नाही तर मला एअरफोर्समध्ये भरती व्हायचे आहे. पण पप्पा काही केल्या ऐकायला तयार नाहीत.’

‘तू तुझ्या पप्पांना समजावून सांगितलेस का?’

‘होय. खूप खूप वेळा समजावलं. पण ते म्हणताहेत – एवढं मोठं आपलं हॉस्पिटल, एवढा बसलेला जम... तू डॉक्टर होऊन आलास तर सर्व आयते मिळेल. हॉस्पिटल तुझ्या ताब्यात देतोय... पैसा खोऱ्यासारखा मिळतोय... उगीच इंजिनिअर किंवा एअरफोर्स डोक्यात घेऊन भिकेचे डोहाळे लावून घेऊ नकोस. मी सांगतोय तसा मेडिकल सीईटीच्या परीक्षेचा फॉर्म भर.’

‘तू तुझ्या मनाला आणि आतल्या मनाला विचार की, मी काय करू! ते सांगेल ते तू कर.’

‘माझे अंतर्मनच सांगतेय, आपणास डॉक्टर व्हायचे नाही. आपल्याला इंजिनिअरच व्हायचे आहे.’

‘तू दोन्ही सीईटींना बस. कुठला पेपर चांगला लिहायचा, कुठला चांगला लिहायचा नाही, हे तुझ्या हातात आहे.’

‘तसे नकोच. ते पप्पांना फसवल्यासारखे होईल. मला पप्पांना फसवायचे नाही.’

‘मग तू त्यांना सरळ सांगून टाक की, मी डॉक्टर होणार नाही, मी इंजिनिअरच होणार.’

‘पाहतो, एकदा त्यांना शेवटचे सांगतो.’

एवढे बोलणे झाल्यावर मी स्कूटर सुरू करून घरी गेलो.

मी हा संवाद घरी मॅडमना सांगितला. त्या म्हणाल्या, ‘होय, त्याला डॉक्टरी पेशाबद्दल लहानपणापासूनच नावड आहे. डॉक्टरांनी आता थोडे मुलाच्या कलाने घ्यावे. त्याला आवडत नाही डॉक्टरी, ना आवडू दे. त्यांची दुसरी लहान मुलगी आहे, तिला त्यांनी डॉक्टर बनवावे.’

त्यानंतर दहा-बारा दिवस उलटले असतील-नसतील, एक भयंकर बातमी आमच्या कानावर आदळली. त्या बातमीने आमचे घरदार सुन्न होऊन गेले. डॉक्टरांच्या बरोबर भयंकर भांडण झालेल्या सुजीतने नायलॉनच्या दोरीने बंगल्याबाहेरच्या बदामाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली होती.

**रघुराज मेटकरी**
मु.पो. विटा, जि. सांगली.
Mob.: 9850482153

## सूचना, तक्रारी, अपेक्षा!

प्रिय वाचकहो, साधना वाचकांच्या मनाचा कानोसा घेण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून, प्रत्येक तीन-चार वर्षांनंतर वाचकांकडून सूचना, तक्रारी, अपेक्षा मागवणारे एक निवेदन प्रसिद्ध केले जाते. त्याच प्रक्रियेचा भाग म्हणून हे आवाहन करीत आहोत.

साधना अंकातील संपादकीय भूमिका आणि साधनात प्रसिद्ध होत असलेले लेखन, याबाबत जास्तीत जास्त वाचकांनी आपली मते आम्हाला कळवावीत अशी विनंती आहे. आपले म्हणणे शक्य तितक्या सविस्तरपणे साधना कार्यालयाच्या पत्त्यावर पत्र पाठवून किंवा ई-मेलद्वारे कळवले तर आम्हाला जास्त आनंद वाटेल. पण ज्यांना हे दोनही पर्याय कोणत्याही कारणाने नको वाटत असतील, त्यांनी थेट संपादकांशी दूरध्वनीवरून बोलावे. बुधवार ते शनिवार या चारही दिवशी दुपारी १२ ते ५ या वेळेत फोन केला तर आम्हाला अधिक सोयीचे ठरेल.

वाचकांकडून आलेल्या या प्रतिक्रिया प्रसिद्धीसाठी नाही, तर साधना अंकांत योग्य ते बदल करण्यासाठी मागवत आहोत. मात्र या सर्व प्रतिक्रियांचा एकत्रित विचार करून, त्यांबाबत स्पष्टीकरण देणारे व वस्तुस्थिती सांगणारे संपादकीय टीपण जून महिन्यातील पहिल्या अंकात प्रसिद्ध करणार आहोत. त्याच टिपणात साधनाचे संपादन, वितरण व अन्य उपक्रमांबाबत वाचकांशी हितगुज केले जाईल. कौतुकाच्या आणि वाटचाल योग्य दिशेने चालू असल्याच्या प्रतिक्रिया तर येतीलच; पण परखड मतप्रदर्शन करणाऱ्या आणि अप्रिय किंवा कटु वाटणाऱ्या प्रतिक्रियांचेही स्वागतच आहे.

**संपादक, साधना**
vinod.shirsath@gmail.com / Mob.: 9850257724

# गोहत्याबंदीसंबंधी इस्लामची भूमिका– आता दारूबंदी हवी

हिंदू धर्मात 'गाई'ला जगातील सर्वांत श्रेष्ठ प्राणी मानले असून गाईला 'माता' (गोमाता) असे म्हटले आहे. हिंदू धर्मात 'गाई'ची पूजा केली जाते. भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलांमध्ये गोपी, दूध–दही–लोणी यांचा मुख्य उल्लेख आढळून येतो. 'गोमातेस' मातृशक्तीचे साक्षात प्रतीक मानले आहे. हिंदू धर्मानुसार पवित्र असणारी ही गाय शेतकऱ्यांसाठी 'कामधेनू' आहे. शेतकरी व शेतीव्यवसाय आज उद्ध्वस्त होत असताना या 'कामधेनू'ची हत्या कायद्याने थांबवून महाराष्ट्र शासनाने अत्यंत शहाणपणाचे पाऊल उचलले आहे. गोहत्या व कसाब किंवा मुस्लिम समाज यांचा संबंध लावून मुस्लिमांबद्दल दुराग्रह बाळगणे योग्य होणार नाही. समग्र भारत पुढे न्यावयाचा असेल, तर मुस्लिमांनाही विकासाच्या गंगेत सामावून घ्यावे लागेल. पवित्र कुराणमध्ये 'दारू पिणे' निषिद्ध मानले आहे. महाराष्ट्रात दारूबंदी करून दारूपायी उद्ध्वस्त होणारे लाखो गरीब संसार दारूरूपी नरकातून मुक्त करण्याचे पुण्य महाराष्ट्र सरकारने पदरी घ्यावयास हवे. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व मुस्लिम विचारवंत डॉ. एस. एन. पठाण यांनी यावर टाकलेला प्रकाश.

जगाला जीवन देणारी सर्वश्रेष्ठ 'गोमाता' असा गाईचा उल्लेख हिंदू धर्मात आढळतो. ब्रह्मदेवाने जेव्हा विश्वाची निर्मिती केली तेव्हा त्यांनी सर्वप्रथम गाईची निर्मिती केली, असा धर्मग्रंथात उल्लेख सापडतो. भगवान शंकर नेहमी गाईबरोबर राहत असत. भगवान शंकराचे वाहन 'गो'पुत्र म्हणजे नंदी (वृषभ) आहे. यामुळेच सर्व देवतांनी महादेवाला सर्व पशूंचा प्रमुख म्हणून 'पशुपतिनाथ' असं म्हटलं आहे. श्रीरामचरित्रमानसमध्ये 'गोदान' म्हणजे सर्वश्रेष्ठ दान असा अनेक वेळा उल्लेख आहे. भगवान श्रीकृष्ण जेव्हा मोठे झाले, तेव्हा ते गाई चरायला घेऊन जात असत. भगवान श्रीकृष्ण जेव्हा बासरी वाजवीत, तेव्हा चरणाऱ्या सर्व गाई चारा सोडून बासरीच्या आवाजाच्या दिशेने धावत येत असत. गाईची सेवा कशी केली जाते याचे सर्वोत्तम उदाहरण तर स्वत: भगवान श्रीकृष्ण यांनीच घालून दिले आहे.

**'गाई'विषयी इस्लामचा दृष्टिकोन**

इस्लाम धर्माचे संस्थापक ह.मोहंमद पैगंबर यांनी आपल्या शिष्यांना जो उपदेश केला, त्यांचे एकत्रीकरण ते पैगंबरवासी झाल्यानंतर करण्यात आले. त्यास 'हादीस' असे म्हणतात. हजरत पैगंबरांची गाईबद्दलची भूमिका सांगण्यासाठी खालील काही 'हादीस'चा उल्लेख केला जातो.

१. हजरत पैगंबर यांची पत्नी सांगते की, हजरत म्हणत असत की– गाईचे दूध, तूप हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत लाभदायक (शिफाबक्श) असून गाईचे मांस खाल्ल्याने आजार वाढू शकतात. (मुस्लिम शरीफ, हयातुल हैवान पृष्ठ नं. ३९७)

२. ह.मोहंमद पैगंबर म्हणतात, गाईचे दूध आणि तूप तुम्ही खाल्ले पाहिजे, परंतु गाईचे मांस तुम्ही खाऊ नका. कारण त्यामुळे तुम्ही आजारी पडाल. (इबने मसूद रजी. इयातुल हैवान पृष्ठ नं. ३९८)

३. हजरत पैगंबर म्हणत, गाईचे तूप आरोग्यासाठी सर्वोत्तम असून यापेक्षा आरोग्यासाठी उत्तम असे दुसरे काही नाही. (हजरत अली, हयातुल हैवान पृष्ठ नं. ३९८)

**मुस्लिमांमध्ये गाईबद्दल आदर**

हजरत पैगंबरांच्या काळात मध्य आशियामध्ये इस्लामचा प्रसार झाला होता, परंतु भारतावर मात्र त्याचा परिणाम झाला नाही. भारतामध्ये इस्लामचा प्रसार अजमेरचे ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती (गरीब नवाझ) आणि दिल्लीचे हजरत निजामुद्दीन औलिया यांच्या काळात अधिक प्रमाणात झाला. परंतु त्या काळात 'गाई'वरून हिंदू–मुस्लिमांमध्ये मतभेद झालेले कधीच दिसून येत

नाही. याचे कारण त्या वेळी इस्लाममध्ये नव्याने दाखल झालेले मुस्लिम बंधूदेखील आपण भारतीय आहोत याचे भान ठेवून होते आणि त्यांनी गोहत्येचा विचार कधीच केला नाही.

**बदनाम बाबरास गाईबद्दल आदर**

मुगल बादशहा बाबर जेव्हा आजारी होता, तेव्हा त्याने मोठ्या उद्वेगाने हुमायूँ या आपल्या चिरंजीवास पत्र लिहिले आहे. त्या वेळेस हुमायूँ काबुलमध्ये होता. बाबर असे म्हणतो की, 'माझ्या आजारपणाच्या काळात येथील मंत्री-सरदार यांनी भारतामध्ये अक्षरशः हैदोस घालण्यास सुरुवात केली आहे आणि येथील सामाजिक वातावरण पूर्णपणे बिघडून टाकले आहे.' बाबर यांनी पत्रात पुढे आपले चिरंजीव हुमायूँ यांना असा उपदेश केला आहे की, हुमायूँने भारतात गोहत्येपासून दूर राहावे व हिंदूंच्या भावना दुखवू नये. पुढे सन १७०० मध्ये इंग्रज भारतात येईपर्यंत गाय व डुक्कर यांची भारतात हत्या केली जात नव्हती. यावरून गाईबद्दल इस्लाम धर्मीयांमध्ये आदरच दिसून येतो.

**इंग्रजांनी हिंदू-मुस्लिमांत फूट पाडली**

हिंदूंना गाय पूजनीय, तर मुसलमानांना डुक्करांचे मांस निषिद्ध. परंतु हे दोन्ही प्रकारचे मांस (गाय आणि डुक्कर) इंग्रजांना फार प्रिय होते. इंग्रजांनी मुस्लिमांचा बुद्धिभेद केला व त्यांना लालुच दाखवून गाईची 'कुर्बानी' (गोहत्या) करावयास भाग पाडले. त्याचप्रमाणे हिंदू समाजातील काही जातींना लालुच देऊन डुकराची हत्या करण्याची सुरुवात केली. हिंदू आणि मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याचा हा सोपा मार्ग ब्रिटिशांनी स्वीकारला. इंग्रजांविरुद्ध १८५७ चा पहिला स्वातंत्र्यलढा झाला, तेव्हा काडतुसांमध्ये गाय आणि डुक्कर यांची चरबी आहे हाच मुख्य मुद्दा होता. त्या वेळी बहादूरशहा जफर यांनी अशी घोषणा केली होती की, जो कुणी गाईची हत्या करेल, त्यास मृत्युदंडाची शिक्षा दिली जाईल.

**भारतीय शेतीसाठी गाय कामधेनू**

हरित क्रांतीचे मूळ यश म्हणजे अधिक उत्पन्न देणारे अनेक वाण आपल्या शास्त्रज्ञांनी शोधून काढले, परंतु अधिक उत्पन्नासाठी आपण रासायनिक (जोर खते) खतांचा बेसुमार वापर करण्यास सुरुवात केली, मोठ्या प्रमाणात जंतुनाशके व कीटकनाशके वापरणे भाग पडले; परिणामी संपूर्ण भारतीय शेतीच हळूहळू विनाशाकडे जाऊ लागली आहे. रासायनिक खताच्या किमती आकाशाला भिडल्या असून शेतकरी अडचणीत सापडला आहे व शेतकऱ्यांचे आत्महत्येचे सत्र सुरू आहे. गरज आहे या रासायनिक शेतीपासून आपणास सेंद्रिय शेतीकडे वळण्याची आणि यासाठी गाय व गोवंश प्राणी हे वरदान ठरणार आहेत. गाईपासून मिळणारे शेणखत आणि गोमूत्र यांचा सेंद्रिय शेतीमध्ये अत्यंत महत्त्वाचा वाटा राहणार आहे. विषयुक्त शेतीमालापासून मुक्त होण्यासाठी 'गाय' आपणास संजीवनीच ठरणार आहे. गोवंशहत्या बंदी अधिनियम आणून महाराष्ट्र शासनाने समग्र शेतजमीन व जनता यांच्यावर उपकारच केले आहेत. लवकरच संपूर्ण भारतात गोवंश हत्याबंदीचा आदर्श कायदाच व्हावयास हवा.

**मुस्लिमांबद्दल दुराग्रह नको**

गाईचा वध कसाब-कसाई करतो, म्हणून मुस्लिम समाजाबद्दल दुराग्रह बाळगणे चूक ठरेल. यासाठी कडक शासकीय कायदे हवेत व त्यांची अंमलबजावणी झाली पाहिजे. कायद्यातील पळवाट शोधून दूध न देणारी, थकलेली, अशी कारणे दाखवून व तशा प्रकारची सरकारी प्रमाणपत्रे देऊन गाईची हत्या करण्यास कसाबाला भाग पाडणे योग्य होणार नाही. कसाई समाजातील तरुणांना व समग्र मुस्लिम समाजाला विकासाच्या गंगेत घ्यावयास हवे. राष्ट्रनिर्मितीसाठी सर्वांचा विकास साधल्याशिवाय सर्वांची साथ कशी मिळेल? खरे तर 'सबका विकास' हा विचारच मुळी अत्यंत राष्ट्रीय आहे.

**दारूबंदीही आणावी**

खरं म्हणजे, आधुनिकतेच्या नावाखाली धर्मग्रंथाकडे अंधश्रद्धा म्हणून पाहण्याचा 'पाया' ब्रिटिशांनी घातला. वास्तविक हे सर्व धर्मग्रंथ म्हणजे जीवनग्रंथ आहेत. पवित्र कुराणमध्ये दारू पिणे निषिद्ध (हराम) मानले आहे. दारूबंदी ही महाराष्ट्रातील गरीब समाजाची मागणी आहे, हे नुकतेच शासनाने चंद्रपूरमध्ये दारूबंदी करून मान्य केले आहे. दारूरूपी नरकापासून गरिबांना वाचवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने आता संपूर्ण राज्यात दारूबंदी आणून पुण्य पदरात पाडून घ्यावे. असे जर झाले, तर हिंदू आणि मुस्लिम दोघांनाही आपल्या धर्माचा खरा अर्थ कळला आहे, असेच म्हणावे लागेल.

**डॉ. एस. एन. पठाण**
माजी कुलगुरु,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर

# शरद यादवांचं काय चुकलं?

मोरा गोरा अंग लै ले, मोहे श्याम रंग दै दे।

Take my fair body away, and give me a dark skin

या गीतातले शब्द गुलजारांचे आहेत, पण गीत प्राचीन आहे. द्वापरयुगापासून राधा ते गात आली आहे. कृष्णाच्या श्याम रंगाने युगानुयुगे भुरळ घातली आहे भारतीय मनाला. पण परवा राज्यसभेत खासदार शरद यादव यांनी दाक्षिणात्य काळ्या रंगाचं कौतुक काय केलं, अन् मंत्री महोदया स्मृती इराणी भडकून काय उठल्या... दोन्ही हातांचे तळवे एकमेकांवर आपटत त्यांनी हात जोडले आणि यादवसाहेबांनी महिलांच्या रंगाच्या भानगडीत पडू नये, असं फर्मावलं.

शरद यादव यांचं सभागृहातलं आणि मैदानातलं बोलणंही तत्त्वचिंतनात्मक असतं. त्यामुळे कधी कधी त्यांचे शब्दप्रयोग आणि मांडणी अनेकांच्या डोक्यावरून जाते. ते बेबाक बोलण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. पण बोलतात ते विचारपूर्वक. बोलल्यानंतर बदलत नाहीत, इन्कार करत नाहीत, परिणामांची तमा बाळगत नाहीत. कालही ते म्हणाले, 'चाहे धरती फट जाय, हम माफी नही माँगेंगे.' शरद यादव स्त्रीविरोधी नाहीत; स्त्री-सन्मानाच्या बाजूने उभे आहेत.

'हमने गलत क्या कहाँ?' शरद यादव यांचा हा सवाल होता. राम आणि कृष्ण काय काळे नव्हते? मोरा गोरा अंग लै ले, मोहे श्याम रंग दै दे, हे गीत का गायलं जातं? देशातले बहुसंख्य लोक आणि महिला काळ्या रंगाच्या, सावळ्या रंगाच्या आहेत. दाक्षिणात्य स्त्रिया तर अधिक सुंदर आहेत. आमच्या उत्तरेकडच्या स्त्रियांपेक्षा त्या खूबसूरत आहेत. केवळ काळ्या रंगाने नाही; रूपानेही, बांध्यानेही. गोरा रंग श्रेष्ठ हा डोक्यात शिरला आहे. मॅट्रिमोनियल जाहिरातीत म्हणून 'गोरी बायको हवी', अशी मागणी असते. सावळ्या रंगाच्या पुरुषांनाही गोरी बायकोच हवी असते. शरद यादव यांच्या या बोलण्यामध्ये आक्षेपार्ह काय आहे?

तरीही इलेक्ट्रॉनिक मीडियाला प्रश्न पडला, शरद यादव क्या बोल गये? माझा साधा प्रश्न आहे, शरद यादवजीने क्या गलत कहाँ?

गांधी आणि लोहियांचं नाव का घेता? उगाच आमच्या बायकांच्या रंगाला नावं ठेवू नका, असा सवाल स्मृती इराणींनी पुन्हा विचारला आहे.

डॉ.राममनोहर लोहिया काय म्हणत होते? श्यामल वर्णाची नेहमीच उपेक्षा झाली आहे असे नव्हे, किमान हिंदुस्थानात तरी तसे झालेले नाही. संस्कृत साहित्यात कृष्णवर्णीय श्यामा सुंदर मानली आहे. ती काळीच असली पाहिजे असे नव्हे; ती जर सुंदर आणि तरुण असली, तरी तिला श्यामा म्हणत. म्हणजेच यौवन आणि लावण्य एकच मानले जाई.

शरद यादव पक्के लोहियावादी आहेत. त्यांच्या मांडणीमध्ये लोहिया ठासून भरलेले असतात. भारतीय संसदेत मधु लिमयेंच्या नंतर लोकशाही समाजवादी विचारांचा दुसरा मोठा प्रवक्ता नाही, एकमेव शरद यादव आहेत. स्त्रीदास्य-व्यवस्थेचे समर्थक असलेले सत्ताधारी वर्गातले नेते शरद यादवांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहेत. जातिप्रथा आणि स्त्रीदास्य ही देशाच्या अधःपतनाची पाळंमुळं आहेत. अशी नर-नारी समता सांगणाऱ्या लोहियांचे शिष्य आहेत शरद यादव. जात, वर्ण, रंग आणि लिंगभेदाच्या विरोधात ज्यांची मांडणी स्पष्ट आहे; त्यांत शरद यादव यांचा समावेश आहे.

स्त्री सुंदर आणि रूपवान मानायची, ती कोणत्या निकषावर? शरद यादव यांना दाक्षिणात्य स्त्री आणि त्यांचा काळा रंग गोऱ्या रंगापेक्षाही अधिक उजळ वाटतो. गोऱ्या रंगामागचं राजकारण देशाच्या सर्वोच्च सभागृहात धाडसाने मांडल्याबद्दल शरद यादव यांचं खरं तर अभिनंदन करायला हवं. लोहियांनी त्यांच्या 'रंग आणि सौंदर्य' या ललित निबंधात या राजकारणाची नेमकी चिकित्सा केली आहे–

''सौंदर्याच्या निकषाबद्दलची ही विकृत दृष्टी राजकीय प्रभावातून निर्माण होत असली पाहिजे. जवळपास तीन शतके युरोपाचे गौरवर्णी लोक जगावर वर्चस्व गाजवत आहेत; सत्ताधारी बनून राहिलेले आहेत. सत्ता आणि समृद्धी सदैव त्यांच्या अधीनच होती. गौरेतरांजवळ मात्र सत्ता-समृद्धीचा अभाव होता. युरोपच्या गौरवर्णीयांप्रमाणे आफ्रिकेच्या निग्रोंची सत्ता जगावर असती, तर नारीसौंदर्याचे निकष नक्कीच वेगळे झाले असते. निग्रोंची कातडी सॅटीनसारखी मुलायम असते, असे कवी आणि

ललित लेखकांनी म्हटले असते. इतकेच नव्हे, तर त्या कातडीचा स्पर्श आणि दर्शन मुलायम असते अन् वाढवणारे आहे, असेही त्यांनी मानले असते. निग्रोंचे सुंदर ओष्टद्वय किंवा शोभिवंत नाक त्यांना उत्फुल्ल दिसले असते. सौंदर्यकल्पनांवरही राजकारण वर्चस्व गाजवते. सत्ता-विशेषकरून सर्वंकष सत्ता तर सुंदरही दिसू लागते.''

भारतीय अभिजात साहित्यात गोऱ्या रंगाचं कौतुक अभावानेच आढळतं. 'रंगात रंग तो श्याम रंग' ही भारतीय संकल्पना ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर पुसली गेली आणि गेल्या २५० वर्षांत भारतीय नेणिवेची गोऱ्या रंगाने पकड घेतली. मॅक्समुल्लरच्या आर्य सिद्धांताने बळ मिळालेल्या आर्य-वंश-वर्णवर्चस्ववादी हिंदुत्वाच्या राजकारणाने गोरा रंग आणखी सफेद केला. आर्य श्रेष्ठत्वासाठी रंगाचा नवाच आधार मिळाला. 'ब्लॅक इज ब्युटिफुल' या 'ब्लॅक प्राईड' मूव्हमेंटची सुरुवात ६० च्या शतकात अमेरिकेत झाली. तेव्हा भारतीय वर्तमानपत्रातल्या जाहिराती गोरीच बायको हवी, या मागणींनी भरून गेल्या होत्या. गुलामांच्या बाजारांनी, रंगभेदांनी, अमानुष शोषणांनी आणि माणूसपण जाळणाऱ्या अपमानांनी बरबटलेली शतके मागे टाकत आफ्रिकेत व अमेरिकेत काळ्या बंडाचे वारे वाहत होते; तेव्हा काळ्या रंगाने अपमानित झालेली भारतीय स्त्री अपमान आणि अप्रतिष्ठित भविष्याने आणखीन काळवंडून जात होती.

हे कधी घडत होतं? वहिनीच्या किंकाळ्या ऐकून राजा राममोहन रॉय सतीप्रथेच्या विरोधात उभे राहिले, त्याला दोनशे वर्षे उलटून गेलेली आहेत. स्त्रीदास्याची बेडी तोडण्यासाठी महात्मा फुले शाळा उघडत होते, त्याला दीडशे वर्षे उलटून गेलेली आहेत. जात, वर्ण, धर्म, रंग, लिंग, भेद संपुष्टात आणण्याचा पुकारा करणारं संविधान डॉ.बाबासाहेबांनी दिलं, त्यालाही अर्धशतक उलटून गेलेले आहे. तेव्हा हे घडत होतं. महात्मा होण्याच्या आधी गांधीजी दक्षिण आफ्रिकेत होते. 'दक्षिण आफ्रिकानां सत्याग्रहनो इतिहास' या नावाने गुजरातीत त्यांनी पुस्तकच लिहिलं आहे. वालजी गोविंदजी देसाई यांनी त्याचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध केला आहे. अलीकडेच पंढरीनाथ सावंतांनी त्याचा मराठी अनुवाद केला आहे. आफ्रिकेचा इतिहास सांगताना गांधीजींनी काळ्या रंगाबद्दल लिहिलंय...

''१९१४ मध्ये या विस्तीर्ण प्रदेशात हबशींची वस्ती जवळजवळ पन्नास लाख आणि गोऱ्यांची वस्ती साधारण तेरा लाख होती. हबश्यांमध्ये झुलू फार धिप्पाड नि रूपसुंदर मानले पाहिजेत. 'रूपसुंदर' हे विशेषण मी हबश्यांच्या बाबतीत हेतुपूर्वक वापरले आहे. सफेद कातडी आणि धारदार नाक यांवर आपण सौंदर्याचा शिक्का मारतो. पण हा समज घटकाभर बाजूला ठेवला, तर झुलूंना घडवण्यात ब्रह्मदेवाने काही कमतरता ठेवली आहे, असे आपल्याला वाटणार नाही. स्त्री-पुरुष दोघेही उंच आणि उंचीच्या प्रमाणात रुंद छातीचे असतात. पोटऱ्या आणि दंड मांसाने भरलेले, नेहमी गोलाकार दिसतात. स्त्री किंवा पुरुष वाकून किंवा पोक काढून चालताना क्वचितच पाहायला सापडतो. ओठ जरूर मोठे व जाड असतात; पण सबंध शरीराच्या आकाराच्या प्रमाणात किंचितही बेडौल असतात, असे मी तरी म्हणणार नाही. डोळे गोल आणि तेजस्वी असतात. नाक थबकट आणि मोठ्या तोंडाला शोभावे एवढे मोठेच असते. त्यांच्या डोक्यावरचे कुरळे केस त्यांच्या शिसवासारख्या काळ्या आणि तुकतुकीत कातडीवर शोभून दिसतात. एखाद्या झुलूला विचारले की, 'दक्षिण आफ्रिकेत राहणाऱ्या हबशी जमातींमध्ये सर्वांत जास्त सुंदर कोणती?' तर तो आपल्या जमातीसाठी दावा करेल आणि मला त्यात त्याचे जराही अज्ञान दिसणार नाही. युरोपात आज सँडो वगैरे त्यांच्या शिष्यांचे बाहू, हात वगैरे घडविण्यासाठी जे प्रयत्न करीत आहेत; त्यांतील काहीएक प्रयत्न न करता या जमातीचे अवयव घट्ट आणि आकाराने सुंदर रीतीने घडलेले बघायला मिळतात. विषुववृत्ताच्या जवळ राहणाऱ्या रहिवाशांची चामडी काळीच असणार. तो निसर्गनियमच आहे. आणि निसर्ग जे जे घडवतो त्यात सौंदर्यच असते, असे आपण मानले; तर आपण सौंदर्याविषयीच्या संकुचित आणि एकतर्फी विचारांपासून वाचू शकू. एवढेच नव्हे, तर हिंदुस्तानातही आपली कातडी काळवंडली तर आपल्याला सवयीने लाज वाटते आणि नावड निर्माण होते, तिच्यापासून आपण मुक्त होऊ.''

देशाच्या राष्ट्रपित्याने गायलेलं हे मुक्तिगीत इराणीबाईंनी वाचलं असण्याची शक्यता कमीच आहे. ब्रिटिशांच्या जोखडातून भारताला गांधींनी मुक्त केले. काळवंडलेल्या बुद्धिदंभातून भारतीयांची मुक्तता मात्र अजून व्हायची आहे.

**कपिल हरिश्चंद्र पाटील**
सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद
अध्यक्ष, लोक भारती
kapilhpatil@gmail.com


आपल्या वाहनखरेदीच्या स्वप्नपूर्तीसाठी आमची सुपरफास्ट कार लोन योजना
सुपरफास्ट कार लोन
• रास्त व्याजदर
• परतफेडीसाठी सुलभ पर्याय
• ८४ महिन्यांपर्यंत परतफेडीची मुदत उपलब्ध
सारस्वत बँक
दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)
पुणे झोन - ८/३, एरंडवणा, कर्वे रोड, नळ स्टॉप जवळ, पुणे ४११ ००४
Website:www.saraswatbank.com
e-mail:customerservicecentre@saraswatbank.com

साधना साप्ताहिक :
११ एप्रिल २०१५

License to Post Without Prepayment of Postage No. WPP-6
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ / रजि.क्र. पी.सी.डब्ल्यू./०८०/२०१५-१७
Posted at Marketyard PSO, Pune / Posting Every Thursdy/Date of Publication : 2-4-2015


# लवकरच येत आहेत, साधना प्रकाशनाची तीन नवी पुस्तके...



## कालपरवा
### रामचंद्र गुहा

मागील अडीच वर्षांत रामचंद्र गुहा यांचे ५० लेख साधनातील त्यांच्या पाक्षिक सदरात प्रसिद्ध झाले आहेत. त्यातील निवडक ३० लेखांचे पुस्तक... 'आज'च्या घटना-घडामोडींचे संदर्भ देत काल-परवाचा वेध घेणारे किंवा काल-परवाचे संदर्भ घेत 'आज' समजावून देणारे हे लेख आहेत.



## उंबरठ्यावर
### सदानंद मोरे

मागील दोन वर्षांत, सदानंद मोरे यांचे २५ लेख साधनातील त्यांच्या सदरात प्रसिद्ध झाले आहेत,
त्या सर्व लेखांचा संग्रह असलेले पुस्तक...
प्राचीन आणि आधुनिक, नवे आणि जुने, काल आणि आज यांच्या उंबरठ्यावर उभे राहून दृष्टिक्षेप टाकणारे हे लेख आहेत.



## बहादूर थापा आणि इतर कविता
### संतोष पद्माकर पवार

२०१४ या वर्षांत, संतोष पवार यांच्या आठवणींच्या रिळातील, तुमच्या-आमच्या हिशोबात नसलेल्या २५ व्यक्तींवरील कविता साधनात प्रसिद्ध झाल्या,
त्या सर्व कविता
आता पुस्तकरूपात येत आहेत...

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३० फोन ०२०-२४४५९६३५
sadhana.prakashan@gmail.com